cmyk

नुतनवर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

दैनिक राज्य लोकतंत्र

नवीन वर्षाची पहिली सुर्यकिरणं शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद घेवून येवोत...
-संपादक

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२४९ | बुधवार, दि. १ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये




# शेतकऱ्यांचा निर्धार : आधी चर्चा मगच उपचार

**डल्लेवाल यांची प्रकृती आणखी खालावली, ३६ दिवसांपासून आमरण उपोषण, देशभरातील शेतकऱ्यांचे लक्ष**

**चंदिगढ । वृत्तसंस्था**

**पंजाबच्या खनौरी सीमेवर आमरण उपोषण करणारे शेतकरी नेते जगजित सिंग डल्लेवाल यांची प्रकृती आणखीन खालावली आहे. यावरून सर्वोच्च न्यायालयने पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली आहे. डल्लेवाल यांना उपचार देण्याच्या सूचना पुन्हा एकदा पंजाब सरकारला न्यायालयाने केल्या आहेत. मात्र आधी केंद्राने चर्चेसाठी आमंत्रण द्यावे, मगच डल्लेवाल उपचार घेतील, असे आंदोलक शेतकऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा आदर राखत स्पष्ट केले आहे. यामुळे डल्लेवाल यांच्या** उपचाराचा पेच निर्माण झाला असून देशातील शेतकऱ्यांचे त्यांच्या प्रकृतीकडे लक्ष लागले आहे.



हमीभाव कायद्यासह इतर प्रमुख १३ मागण्यांसाठी पंजाब आणि हरियाणाचे शेतकरी शंभूसह खनौरी सीमेवर आंदोलन करत आहेत. ते १३ फेब्रुवारी २०२४ पासून येथे आंदोलन करत आहेत. मात्र त्यांच्या मागण्या केंद्र सरकारने मान्य केलेल्या नाहीत. यामुळे शेतकरी नेते जगजित सिंग डल्लेवाल

पान २ वर

### सर्वोच्च न्यायालयाकडून प्रकृतीवर चिंता

शेतकरी नेते जगजित सिंग डल्लेवाल यांच्या ढासळत्या प्रकृतीबद्दल सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली आहे. अशातच भारतीय किसान युनियनचे प्रमुख गुरनाम सिंग चढुनी यांनी देखील डल्लेवाल यांच्या खालवत्या प्रकृतीवर चिंता व्यक्त केली आहे. तसेच हरियाणा सरकारला आवाहन करताना, सरकारने शेतकरी आणि केंद्र सरकार यांच्यात मध्यस्थीची भूमीका पार पाडावी, असे म्हटले आहे. शेतकरी खरे प्रश्न मांडत असून सरकारने त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात. शंभूसह खनौरीवर सुरू असणारे आंदोलन संपवण्यासाठी हरियाणा सरकारने महत्त्वाची भूमिका बजावावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## ७ जानेवारीपर्यंत महाराष्ट्रात थंडीची लाट

**पुणे । प्रतिनिधी**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार नववर्षाची सुरुवात गुलाबी थंडीने होणार आहे. येत्या चार ते पाच दिवसांत किमान तापमानात घट होणार असल्याने थंडी वाढणार आहे. हिमाचल प्रदेश, राजस्थान, पंजाब हरियाणा भागात थंडीची लाट राहणार असून राज्यात कोरडे हवामान राहणार आहे. राज्यातील कोकणासह उत्तर महाराष्ट्रात काही दिवस आकाश निरभ्र असेल. विदर्भात वाऱ्याचा वेग सामान्य राहणार आहे. असे असले तरीही इथे ढगांचे काहीसे सावट पाहायला मिळेल. नांदेड, बीड, परभणी,

पान २ वर

# शरण आलेल्या वाल्मिक कराडला केज न्यायालयात केले हजर

**केजमध्ये सौम्य लाठचार्ज, बाजारपेठ बंद, कोठडीत सीआयडी करणार कसून चौकशी**

**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या अनुषंगाने खंडणीच्या गुन्ह्यात आरोपी असलेले वाल्मिक कराड यांना मंगळवारी दि.३१ डिसेंबर रोजी केज न्यायालयात रात्री उशिरा हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना कोठडी दिल्यानंतर सीआयडीकडून त्यांची कसून चौकशी करण्यात येणार आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून वाल्मिक कराड सुमारे १९ दिवस फरार होते. मात्र मंगळवारी सकाळी ते सीआयडीच्या पुणे कार्यालयात शरण आले. आता सीआयडीकडून त्यांची कसून चौकशी करण्यात येणार असून, त्यानंतरच त्यांचा कुठे आणि कसा सहभाग आहे हे स्पष्ट होणार आहे. दरम्यान, केजच्या न्यायालय परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी जमल्याने याठिकाणी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती, मात्र मोठ्या प्रमाणात पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी सौम्य प्रमाणात लाठीचार्ज करण्यात आला.**

संतोष देशमुख यांची हत्या होवून २२ दिवस झाले, तरी संतोष

पान २ वर



### ती स्कॉर्पिओ कोणाची?

दरम्यान,वाल्मिक कराड ज्या गाडीतून सीआयडी कार्यालयात आला, त्या गाडीचा क्रमांक हा एमएच २३ बीजी २२३१ असा आहे. ही गाडी अनिता शिवलिंग मोराळे नामक व्यक्तीच्या नावे असून तो शिवलिंग मोराळे ही व्यक्ती बीड जिल्ह्यातील पालीचा रहिवाशी असल्याची प्राथमिक माहिती आहे. तर, शिवलिंग मोराळे हा मंत्री धनंजय मुंडेंचा कार्यकर्ता असल्याचे दिसून येते. मात्र, याबाबतही अधिकृत माहिती लवकरच समोर येईल.

### संतोष देशमुख हत्याप्रकरणाशी माझा संबंध नसून राजकीय हेतुने मला अकडवण्याचा डाव-वाल्मिक कराड

संतोष देशमुख हत्याप्रकरणात आरोपी व मास्टरमाईंड असल्याचा आरोप वाल्मिक कराडवर करण्यात आला आहे. त्यानंतर अखेर २२ दिवसानंतर वाल्मिक कराडने शरणागती पत्कारली आहे. वाल्मिक कराड आपल्या खासगी कारमधून पुणे सीआयडी कार्यालयात दाखल झाले. एखाद्या चित्रपटातील दृश्य असल्यासारखे असून पोलिसांना शरण येण्यापूर्वीच वाल्मिक कराडनेएका व्हिडिओच्या माध्यमातून स्वत:ची बाजू मांडली होती. त्यामध्ये, संतोष देशमुख हत्याप्रकरणाशी माझा संबंध नसून राजकीय हेतुने मला अकडवण्याचा डाव असल्याचेही कराडने म्हटले होते. आता, वाल्मिक कराडच्या शरणागतीनंतर विरोधक आक्रमक झाले असून वाल्मिक कराडला शरण यायला कोणी सांगितलेल, कुणाच्या सांगण्यावरुन तो शरण आला असा सवाल उपस्थित होत आहे.

### वाल्मिक कराड ३ दिवस पुण्यातच होता

वाल्मिक कराडच्या एका कार्यकर्त्याने आम्ही आता अक्कलकोट वरून आलेलो आहोत, असे म्हटले. तर एका नगरसेवकाने वाल्मिक कराड गेल्या तीन दिवसांपासून पुण्यातच असल्याचा खुलासा केला आहे. वाल्मिक कराडवर खोटे आरोप करण्यात आले. ते आज स्वत:हून हजर झाले आहेत. खोट्या आरोपांमुळे ते घाबरले असतील म्हणून ते पोलिसांसमोर आले नसतील, असेही या नगरसेवकाने म्हटले आहे. यामुळे वाल्मिक कराडचा शोध घेणाऱ्या पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

### जे यात राजकारण करतात, त्यांना लखलाभ -फडणवीस

वाल्मिक कराडच्या शरणागतीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस याची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.



जे या प्रकरणात दोषी असतील त्या कोणालाच आम्ही सोडणार नाही असा इशारा यावेळी फडणवीस यांनी दिला आहे. तसेच या प्रकरणाचे राजकारण करणाऱ्यांचे त्यांनी कान टोचले. संतोष देशमुख यांच्या कुटुंबाशी माझे फोनवर बोलणे झाले आहे. या घटनेत जे दोषी असतील त्या कोणालाच सोडणार नाही. प्रत्येक दोषींवर कारवाई करणार. जाणीवपूर्वक हा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. ज्यांचा - ज्यांचा या घटनेत सहभाग आहे, त्या प्रत्येकावर कारवाई होणार असून आम्ही कोणालाही सोडणार नाही, मात्र ज्यांना यामध्ये राजकारण महत्त्वाचे वाटते त्यांना ते लखलाभ असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

### शरणांगती स्वखूशीने नाही - आ.सुरेश धस



वाल्मिक कराड सीआयडी कार्यालयात शरण आल्यानंतर भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी पहिली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, ''वाल्मिक कराड हा काही स्वखूशीने शरण आला नाही. त्याची मालमत्ता जप्त करण्यात येणार होती. त्याच्या पत्नीला चौकशीला घेऊन येणार होते. तर त्याची बँक खाती गोठवण्यात आली होती. त्यामुळे तो सीआयडीकडे शरण आल्याचा दावा आमदार धस यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणात जातीने लक्ष घातले. सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी ॲक्शन घेतल्यानंतर ते शरण आल्याचा दावा आ.धसांनी केला. प्रॉपर्टी शीज करण्याची आता कोर्टाकडे सीआयडीने परमिशन मागितलेली आहे. साधारणतः या आठवड्यामध्ये किंवा जास्तीत जास्त पुढच्या आठवड्यात ही प्रक्रिया सुरू होईल. ही न्यायालयीन बाब आहे. त्याच्यावरती मी टिप्पणी करू इच्छित नाही. परंतु लवकरात लवकर त्यांच्या प्रॉपर्टीज जप्त झाल्या पाहिजेत असे देखील ते यावेळी म्हणाले.

### मंत्री धनंजय मुंडे यांनी तोपर्यंत राजीनामा द्यावा -आ.संदीप क्षीरसागर



बीडचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी प्रतिक्रिया दिली असून ते म्हणाले की, जर तुम्ही दोषीच नाही तर फरार का झाले? असा सवाल क्षीरसागर यांनी केला. सोबतच या संपुर्ण प्रकरणाचा तपास होईपर्यंत मंत्री असलेल्या धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा. प्रकरण जलदगतीने चालल्यास काही महिन्यातच ते संपेल. त्यामुळे ते संपल्यानंतर त्यांना पुन्हा मंत्रीपद देण्यात यावे मात्र तोपर्यंत त्यांनी राजीनामा द्यावा, असे आ.क्षीरसागर म्हणाले.

### निर्दोष होते तर मग पळाले का? - खा. बजरंग सोनवणे



या प्रकरणात बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी कराड हे जर निर्दोष आहेत तर त्यांनी खंडणीचा गुन्हा दाखल झाला त्याच दिवशी शरण यायला पाहीजे होते. एवढा वेळ का लावला असा सवाल उपस्थित केला आहे. कराड यांनी आपण निर्दोष असल्याचा दावा केल्यानंतर खासदार सोनवणे यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

### धनंजय मुडेंना मंत्रीपदावरून हटवा, अजित पवार गप्प का ? संभाजीराजेंचा सवाल

स्वराज्य पक्षाचे संभाजीराजे छत्रपती यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना बीडचे पालकमंत्री करू नका, त्यांना मंत्री पदावरून खाली खेचणे गरजेचे असल्याची प्रतिक्रिया संभाजीराजे यांनी दिली. तसेच या विषयावर अजित पवार गप्प का आहेत, मुंडे यांचे पवार संरक्षण का करत आहेत, असा सवाल त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना केला आहे. कराड हा संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सात आरोपींचा मोरक्या आहे. तो शरण आल्याने विषय संपत नाही. वाल्मिक कराडच्या नावावर १४ गुन्हे दाखल आहेत. यामुळे १४ गुन्हे दाखल असतानाही योग्य ती कारवाई का केली नाही? असा प्रश्न संभाजीराजेंनी उपस्थित केला आहे. त्यांनी वाल्मिक कराडला मोक्का ३लावला गेला पाहिजे, अशी देखील मागणी केली आहे. खंडणीच्या गुन्ह्यात कराडला अटक केली आणि उद्या तो जामीन घेऊन बाहेर येईल, हे आम्ही शांतपणे पाहणार नाही, असे देखील ते यावेळी म्हणाले.



### पंचांग बघून आत्मसमर्पण-दमानिया

दाते पंचांग बघून आत्मसमर्पण केले? खरतर, ही पोलिसांसाठी नामुष्कीची बाब आहे. १७ तारखेला शेवटचा कॉल ट्रेस पुण्यात होता आणि सरेंडर पुण्यातच झाले याचा अर्थ इतके दिवस ते पुण्यातच होते. पुण्यात राहून पोलिसांना न सापडणे बुद्धीला पटण्यासारखं आहे का? पोलिस इंटेलिजेंस काय करत होतं? हे राजकारणी त्यांना संरक्षण देत होते यात शंकाच नाही.' असे ट्विट दमानिया यांनी केले आहे.



### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३१ डिसेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.५० क्विंटल | २,५०० | २,६०१ | २,५५० |
| ज्वारी/हायब्रिड: ५७.५० क्विंटल | १,९६५ | २,७१० | २,२०८ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ७४.५० क्विंटल | ५,५०० | ७,५०० | ७,००० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १९.५० क्विंटल | १,९०० | ३,०१७ | २,५८६ |
| मुग : १.५० क्विंटल | ६,७०० | ७,००१ | ६,८५० |
| सोयाबीन: ६५.५० क्विंटल | ४,०२५ | ४,१११ | ४,०७५ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

## आता विशेष सहाय्याच्या योजनांचे अनुदान डिबीटी प्रणालीद्वारे मिळणार

**अनुदान धारकांना दिलासा, थेट खात्यात जमा होणार रक्कम**

**मुंबई । प्रतिनिधी**

**शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमुळे राज्यातील पात्र निराधारांना दिलासा मिळतो. मात्र, निराधारांना लाभ मिळण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेच्या अर्थसाहाय्याचे वितरण हे थेट लाभ हस्तांतरण पोर्टलच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

पान २ वर

## मंत्रालयातील चौथा मजला पाच वर्षांनंतर पुन्हा गजबजला !

**ना.पंकजाताई मुंडे यांनी जनतेची गाऱ्हाणी ऐकून घेत जागेवरच केला कामाचा निपटारा**

**मुंबई । प्रतिनिधी**

आक्रमक, अभ्यासू आणि कायम लोकांच्या गराडयात असणाऱ्या नेत्या म्हणून ज्यांची उभ्या महाराष्ट्राला ओळख आहे, अशा राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा मंत्रालयातील चौथा मजला आज पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा लोकांच्या गर्दीत गजबजून गेल्याचे पहायला मिळाले. या गर्दीने २०१४ ते १९ च्या आठवणी पुन्हा ताज्या केल्या. ना. पंकजाताई मुंडे यांना मंत्रालयातील

पान २ वर



# नवीन वर्षात बीड जिल्ह्याचे आकाश मोकळे व्हावे एवढीच माफक अपेक्षा

**विशाल साळुंके**

**गेल्या वर्षभरात बीड जिल्ह्यामध्ये अशा काही घटना घडल्या की सर्वसामान्य माणसाला अस्थिर वाटू लागले. बीड जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात बोकाळलेला भ्रष्टाचार, अवैध धंदे जातीय तेढ, दहशतीचे वातावरण या गोष्टींनी बीड जिल्हा हैराण झाला होता .**

संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्याचे नाव जगाच्या पाटलावर गेले असले तरी ही बाब बीड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद नाही. अशा घटना यापुढे घडू नयेत यासाठी आता लोकप्रतिनिधीसह अधिकारी आणि सर्वसामान्य माणसांनी ही काळजी घेणे गरजेचे आहे. सर्वसामान्य माणसापेक्षाही अधिकारी आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी अधिक आहे. कारण या सर्व आराजकतेचे मूळ भ्रष्टाचारात दडलेले आहे . भ्रष्टाचार संपला तर आगामी वर्षभरात बीड जिल्ह्याचे वातावरण अत्यंत चांगले होईल. आणि जातीजातींमध्ये निर्माण झालेली तेढ दुर्लक्ष होऊन जातीय सलोखा निर्माण होईल. या बाबी आता कटाक्षाने पाळणे गरजेचे आहे. गेल्या वर्षभरामध्ये बीड जिल्ह्यातील भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बोकाळला याला काही प्रमाणात अधिकारी आणि कार्यकर्तेही जबाबदार आहेत.




अधिकाऱ्यांनी वेळेत दखल घेतली तर भ्रष्टाचाराचे जे थैमान सुरू झाले आहे. ते रोखले गेले असते. मात्र तसं झालं नाही. यात लोकप्रतिनिधींचाही वाटा मोठा आहे. लोकप्रतिनिधींनी ही याकडे दुर्लक्ष करायला नको होते. मात्र त्यांचेही कुठल्या ना कुठल्या कारणाने या बाबीकडे दुर्लक्ष झाले. आता यापुढे कटाक्षाने या सर्व बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या पाठीमागे बीड जिल्ह्यातील अवैध धंदे आणि भ्रष्टाचार आहे. बीड जिल्ह्यात चालू असलेले राखेचे धंदे, गुटख्याचे धंदे, अवैध दारूचे धंदे, वाळूमाफिया यांनी जे थैमान घातले ते सर्वसामान्य माणसाला भीतीदायकच आहे .अगदी जिल्हाधिकाऱ्यांच्या अंगावर गाडी घालण्या ईतपत वाळू माफियांची मजल जाते. त्याला काय म्हणायचे? याला जसे वाळू माफिया जबाबदार

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# बिहारीकरण रोखण्यासाठी ठोस पावलांची गरज

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण महाराष्ट्रासह संपूर्ण देशभर सध्या गाजत आहे. या हत्येचे धागेदोरे बीडमधील खंडणी रॅकेटशी असल्याचे समोर आले असून, संपूर्ण जिल्हाच गुन्हेगारांनी पोखरल्याचे दिसून येते. वास्तविक, महाराष्ट्रातील मराठवाडा हा प्रदेश राजकीयदृष्ट्या अत्यंत सजग मानला जातो. दुष्काळग्रस्त मराठवाड्यातलाच बीड हा एक जिल्हा. काँग्रेसच्या मातब्बर नेत्या केशरकाकू क्षीरसागर, भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे यांच्यामुळे बीडला नवी ओळख मिळाली. तथापि, मागच्या काही दिवसांपासून खून, मारामाऱ्या, महिलांवरील अत्याचार, खंडणी यामुळे बीड चर्चेत आले आहे. केज तालुक्यातील मस्साजोग हे गाव तर कालपरवापर्यंत कुणाला माहीतच नव्हते. मात्र, या गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येने हे गाव देशाच्या नकाशावर पोहोचले आहे. देशमुख हे भाजपचे कार्यकर्ते. सरपंच म्हणून तीन टर्म त्यांनी अतिशय चांगले काम केले. आपले गाव समृद्ध व्हावे, गावकऱ्यांचे जीवनमान उंचावे, हा त्यांचा ध्यास असे. मात्र, पवनचक्कीच्या खंडणी रॅकेटने त्यांचा बळी घेतल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

मराठवाड्याच्या अनेक भागांत पवनचक्क्यांची कामे सुरू आहेत. मात्र, या कंपन्यांकडून मोठ्या रकमेची खंडणी उकळणारे रॅकेट जिल्ह्यामध्ये सक्रिय असल्याचे पहायला मिळते. मस्साजोग प्रकरण याच खंडणीखोरांभोवती फिरत आहे. याप्रकरणी राज्याचे अन्नधान्य व पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्ती वाल्मिक कराड यांच्यासह सरपंच हत्याप्रकरणातील सुदर्शन घुले आणि राष्ट्रवादीचा तत्कालीन तालुकाध्यक्ष विष्णू चाटे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. खंडणी आणि हत्या हे दोन्ही गुन्हे वेगळे भासत असले, तरी प्रत्यक्षात ते एकमेकांशी संबंधित आहेत. या दोन्ही गुन्ह्यातील खंडणीतील प्रमुख आरोपी वाल्मिक कराड हे पोलिसांना शरण आले असून संतोष देशमुख यांच्या खुनातील मुख्य आरोपी अद्यापही फरार आहे.

सद्य परिस्थितवरून धनंजय मुंडे यांचा पाय आता आणखी खोलात गेल्याचे दिसत आहे. मागच्या काही दिवसांपासून भाजप आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणी धनंजय मुंडे यांच्याविरोधात रान उठवले आहे. दुसऱ्या बाजूला सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही हे प्रकरण लावून धरले आहे. मुंडे आणि कराड यांच्यातील आर्थिक व्यवहार, एकत्रित जमीन खरेदी, मुंडेंसह त्यांच्या मित्रमंडळींची पिस्तूलबाजी आदी बाबी दमानिया यांनी पुराव्यासह समोर आणल्या आहेत. त्यामुळे मंत्री मुंडे चांगलेच अडचणीत आलेले दिसतात. मुख्य म्हणजे हे आरोप काही विरोधी पक्षातील नेत्यांकडून झालेले नाहीत. मुंडे हे राष्ट्रवादी दादा गटाचे, तर धस भाजपचे. हे बघता संशयाचे धुके अधिक गडद होते. इतकेच नव्हे, तर अजितदादा गटाचे नेते प्रकाश सोळंके हे देखील आरोपाचे किटाळ दूर होईपर्यंत मुंडे यांनी राजीनामा देणे योग्य ठरेल, असे म्हणतात. स्वराज्य पक्षाचे नेते छत्रपती संभाजीराजे यांनीही मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, ठाकरे सेनेचे संजय राऊत, काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांच्यासह शिंदे गटानेही हीच मागणी लावून धरली आहे. ही सर्वपक्षीय कोंडी फोडणे, ही मुंडे यांच्याकरिता सोपी बाब नसेल.

विधानसभा निवडणुकीत मुंडे हे विक्रमी मतांनी निवडून आले. मात्र, त्यांची एकूण कार्यपद्धती वादाच्या भोवऱ्यात सापडलेली दिसते. वाल्मिक कराडला अटक होत नाही आणि मुंडेंचा राजीनामा येत नाही, तोवर बीड सोडणार नसल्याची भूमिका दमानिया घेतात. तर मराठा समाजही रस्त्यावर उतरून मुंडेंच्या मागणीसाठी आक्रमक होतो. हा वाढता दबाव सरकारच्या प्रतिमेवरही परिणाम करू शकतो. बीडमधील एकूण परिस्थितीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही नाराज आहेत. गृहमंत्री या नात्याने येथील गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी ते ॲक्शन मोडवर आहेत.

या सगळ्या साफसफाईत मुंडे यांच्या मंत्रिपदाचा बळी जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. राजकीय जीवनात साधनशुचितेला आणि चारित्र्याला अतिशय महत्त्व आहे. महाराष्ट्रातील जुन्याजाणत्या राजकारण्यांचा अशा शुद्ध राजकीय आचरणावरच भर असे. यशवंतराव चव्हाणांच्या महाराष्ट्राने देशाला नेहमीच दिशा दाखविण्याचे काम केले. काँग्रेस, शेकाप, समाजवादी पक्ष, सेना, जनसंघ-भाजप किंवा इतर पक्ष असतील. या पक्षातील नेत्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून नवा वस्तूपाठ आखून दिला. मात्र, मागच्या काही वर्षांत शहरापासून खेड्यापर्यंत राजकारणाचे गजकरण पसरलेले दिसते. राजकारणी आणि त्यांच्या बगलबच्च्यांनी सर्व अवकाश व्यापला असून, त्याची झळ सर्वसामान्य माणसाला बसत असल्याचे दिसून येते. बीड त्याचेच उदाहरण. आता हे बिहारीकरण रोखण्यासाठी सरकारला ठोस पावले उचलावीच लागतील.

## क्रिकेट खेळतांना बॅटस्मनला हृदविकाराचा अटॅक येऊन मृत्यू

जालना । प्रतिनिधी

**जालना येथे सुरु असलेल्या ख्रिसमस्? ट्रॉफीच्या क्रिकेट सामन्यात सोमवारी रोजी एका बॅटस्मनला हृयविकाराचा झटका आल्याने जागीच कोसळून त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे खळबळ उडाली असून, काही काळापुरती ट्राफी स्थगित करण्यात आल्याचे संयोजकांनी सांगितले.**

याविषयी अधिक माहिती अशी की, येथील फेजर बॉईजच्या मैदानावर गत ४-५ दिवसांपासून ख्रिसमस ट्रॉफी क्रिकेट स्पर्धा सुरु आहे. आज सोमवारी साकाळी या ट्रॉफीचा समाना यंगस्टर क्रिकेट क्लब आणि जीजस्? एलेव्हन यांच्यात खेळला जात होता. हा सामना रंगात आलेला असतांनाच ११ वाजेच्या सुमारास क्रिडांगणावर विजय पटेल हा स्ट्राईकच्या दिशेने बॅटींग करीत होता. तो नॉन स्ट्राईकच्या दिशेच्या बॅटस्मनला काहीतरी सांगत पुन्हा बॅटींग करण्यासाठी परतत असतांनाच अचानक खाली कोसळला. सुरुवातीला काहीवेळ कुणाण्याच काही लक्षात आले नाही. मात्र, विजय जमिनीवर कोसळल्याचे लक्षात येताच विकेट किपर आणि खेळाडूंनी पळापळ करून त्याला नेमके काय झाले हे जाणुन घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत विजय बेशुध्द झाला होता. त्याला तात्काळ जवळील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. वियज पटेलचे वय ३२ वर्ष असून, तो जालन्यातील रहिवासी होता. मुंबई येथील नालासोपारा भागात कामावर होता. त्याच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

# सामान्य लोकांहो सामाजिक भान ठेवा

सामान्य लोकांहो थोडी तरी बाळगा. थोडेही सामाजिक भान ठेवायचे नाही आणि सतत दुसऱ्याला आणि सरकारला दोष देत राहायचं. हे कोणत्या माणुसकीचे लक्षण आहे.

समाजातील सर्व प्रश्न सरकारनेच सोडवायचे का?आमदार, खासदार वॉर्ड मेंबर नेच सोडायचे का? छोट्यातील छोटी समस्या पण त्यांनीच सोडवायची का? आपल्या समाजातील गल्लीतील, कॉलनीतील प्रश्न सोडविण्यासाठी आपण काय वाट पाहत उभे राहायचे का?मला खरच असे वाटते की आपण षंढ समाजात राहातो, आपणही षंढ होत चाललोत? हो षंढ च शब्द बरोबर आहे. आपल्या वागण्यात, बोलण्यात आता षंडपणा येतोय. आपण हि या समाजचे घेणे देणें लागतो. आपले सामाजिक प्रश्न आपण हि हाताळले पाहिजे की नुसती बघ्याची भूमिका घ्यायची. आपण नुसते शेजरी, गल्लीत, कॉलनीत फक्त पोकळ चर्चा करायची आणि वर्षानुवर्षे हाताची घडी घालून बसायचे. आपल्यातील तो कणखर पणा संपलाय का? सार काही सरकारनेच करायचे या भूमेकेत असतो.आपल्यातील माणसाला आता जागे करावे लागेल. आपले प्रश्न आपणच सोडवायाला पाहिजे. जे सुटत नसतील तर त्याची मागणी करा पण शांत बसू नका. तुमच्या घरातील पुढच्या पिढीला षंढ करायचे, की एक कर्तव्य दक्ष नागरिक बनवायचे हे तुम्हीच ठरवा. पुढची पिढी आपल्याला पाहून पुढे जात असते हे कायम लक्षात ठेवा. अनेक प्रश्न सोडवता नाही आले तर त्या साठी लढायला शिका. मागणी करायला शिका. आपल्या भागात पाणी येते, त्या दिवशी अशी अवस्था असते सर्वांची घाईगडबड, की कोणत्या युद्धला जणू आपण चाललोत. पाणी येते आपण भरतो. पण नंतर बाकी पाणी एक एक तास वाया जाते. आपल्या घरातील नळाना तोटी नसते. जे पाणी सार्वजनिक ठिकाणी तिथे तर १००% तोटी नसते. तिथे तर खूप ठिकाणी पाणी दोनदोन तास वाया जाते. इथे प्रश्न पडतो की पाणीची कमतरता असते म्हणून आपल्याला पाणी दहा दिवसांनी येते मग हे वाहणारे पाणी वाया का जाते? तुमच्या घरातील आणि गल्लीतील पाण्याची तोटी बसवयला पण आमदार बोलवणार का? सामाजिक कर्तव्याचे भान ठेवा. डोळे उघडा. वाहत असणाऱ्या नळाला आपण स्वतःच तोटी लावून कर्तव्य दक्ष व्हा. दुसरा प्रश्न असा आहे की आपल्या कॉलनीतील नळ खराब झाले तर नगरपालिकेतील लोक येतात आणि दुरुस्ती साठी ते मोठे मोठे खड्डे करतात. नळ दुरुस्त होतो पण ते खड्डे तसेच खोदलेले असतात मग आपण या खड्ड्यात उड्या मारायच्या का? नाहीतर त्यात पडून आपले कंबरडे कायम स्वरूपी मोडून घ्याचे का? चूक दोघांची पण आहे कारण खडे उघडे करताना आपण असतो पण आपण तिथे फक्त बघ्याची भूमिका करतो. ते खड्डे त्यांना भरून देई पर्यंत त्यांच्या मागावर राहिले पाहिजे. उठा,फक्त सतत स्वतःचाच स्वार्थ सोडून उठा आणि सजग रहा. ज्या लोकांनी खड्डे केले. त्यांच्या कार्यालयात खडा बुजे पर्यंत उभे रहा. त्यावरही नगरपालिकेने विचार नाही केला तर त्यांच्या कार्यालया समोर ५-२५ खड्डे खोदून या, मग पहा काय काय होत ते.आपल्या प्रश्नासाठी आपणच उत्तरे शोधूयात. अजून एक बोलायचे राहिले ते म्हणजे कॉलनीत खड्डे होण्याची अजून एक गोष्ट असते आपल्या घरात काही प्रोग्राम असतात त्या साठी आपण मोठे मोठे मंडप घालतो रस्ता ब्लॉक करतो कार्यक्रमाचा सगळा राडा, कचरा तिथेच सोडतो. मंडप घातलेले खड्डे हि तसेच राहतात. इलेक्शन काळातही गल्ली गल्लीत राजकीय सभेच्या वेळेस मंडप घातला जातो. सभा संपली कि सर्व जातात पण खड्डे तसेच राहतात राजकीय नेत्यांची राजकीय पिल्लावळ आधी जय्यत तयारी करते. पण नंतर त्या जागेला परत पाहत नाही. अश्या वेळेस एकच काम केले पाहिजे या सर्व पिल्लावलांना कॉलनीतील लोकांनी बाहेर जाऊ दिलेच नाही पाहिजे जोपर्यंत कॉलनी स्वच्छ होत नाही तोपर्यंत. माझे मार्ग वेगळे असतील कदाचित पण तुमच्या हि मनात हे कुठे ना कोठे असतेच ना हे,मग उठा जागे व्हा, संघटित व्हा.निर्णय घ्या आणि जिवंत रहा. आपली पुढची पिढी आपल्या पाहून मोठी होत असते. त्याच्या समोर कसे वागायचे ते तुम्ही ठरवा.



रुपाली देशपांडे
मो.८८८८९५५५३९

# सरपंच देशमुख व सूर्यवंशी यांच्या हत्याऱ्यांना कठोर शासन देऊन समाजात वाढत असलेली सामाजिक कटुता कमी करावी - राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**सध्या संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेल्या मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख तसेच परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणी दोषींना कठोर शासन करून समाजात होत असलेली जातीय तथा सामाजिक कटुता कमी करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष ,माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे केली आहे.**

केज तालुक्यातील मस्साजोग ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून अतिशय क्रूरपणे हत्या करण्यात आली. त्याचबरोबर परभणी येथील संविधान विटंबना प्रकरणी तुरुंगात असलेले व तुरूंगातच त्यांचा मृत्यु झालेले सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटल्याचे दिसून येते आहे. अनेक ठिकाणी विविध सामाजिक संघटनांनी निषेध मोर्चे, निवेदने, त्याचबरोबर आंदोलन करून दोषींना कडक शासन करण्याची मागणी विविध स्तरातून करण्यात आली आहे. अशाच प्रकारची मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी देखील माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे.



परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ सूर्यवंशी तसेच सरपंच संतोष देशमुख यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी केवळ राज्यातीलच नव्हे तर केंद्रीय पातळीवरील अनेक नेते परभणी व मस्साजोग येथे येऊन गेले. त्यांनी गुन्हेगारांना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी शासनाकडे मागणी केली आहे. त्याचबरोबर जिल्ह्यात शांतता प्रस्थापित होण्यासाठी व केवळ राजकारण करण्यासाठी राजकारनातून खोटे गुन्हे दाखल करू नयेत. राज्यात घडलेल्या या दोन्ही घटनांनी संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. यामुळे समाजात जाती जाती मध्ये कटुता वाढल्याचे सर्वत्र आढळून येते आहे. आपला महाराष्ट्र हा साधू संतांच्या पावन पदस्पर्शाने पुनीत झालेला प्रदेश आहे. महाराष्ट्राला प्राचीन अशी संस्कृती लाभलेली आहे. अशा या महाराष्ट्र राज्यात अशा घटना घडणे हे आपल्या राज्यासाठी अशोभनीय अशी बाब आहे. वारंवार अशा घटना घडल्याने राज्यातील सामाजिक सलोखा बिघडत असून समाजसमाजात वैर तसेच कटुता वाढत आहे. जिल्ह्यात राजकारण करतांना राजकारणाने वैयक्तिक पातळी गाठली असून यातून वैयक्तिक चिखलफेक होत असल्याने राज्यात आपल्या जिल्ह्याचे नाव खराब होत आहे. आणि त्यामुळे जिल्ह्यात नवीन उद्योग येण्यासाठी अडकाठी निर्माण होऊन रोजगाराच्या संधी जिल्ह्यात उपलब्ध होणार नाहीत. पर्यायाने जिल्ह्यात बेरोजगारीचे प्रमाण वाढून येथील युवकांना इतर ठिकाणी रोजगारासाठी स्थलांतर करण्याची वेळ येणार आहे.तेव्हा जिल्ह्यात होणारे जातीपातीचे राजकारण टाळून जातीय सलोखा निर्माण होण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत असेही मत या पत्रकात राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले आहे. राज्यात वाढत असलेली सामाजिक कटुता कमी होण्यासाठी किंवा थांबवण्यासाठी राज्यात वाढत असलेली गुन्हेगारी वृत्ती व गुन्हे थांबले पाहिजेत. गुन्हेगारी व गुन्हेगारांना वेळीच आवर घालून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कार्यवाही होऊन त्यांना कडक शासन होऊन जिल्ह्यात शांततेसोबतच कायदा व सुव्यवस्था राखली जाण्याची मागणी राजकिशोर मोदी यांनी काढलेल्या प्रसिद्धीपत्रकातुन केली आहे.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांचा निर्धार : आधी

गेल्या ३६ दिवसांपासून आमरण उपोषणावर बसले आहेत. ते ७० वर्षीय असून ते कर्करोगाचे रूग्ण आहेत. आता उपोषणामुळे त्यांची प्रकृती पूर्ण खालावली असून त्यांनी कोणत्याही प्रकारची वैद्यकीय मदत घेतलेली नाही. यामुळे सर्वोच्च न्यायालयाने पंजाब सरकारची दोनदा कानउघडणी केली आहे. तसेच त्यांनी उपचार देण्याचे आदेश दिले होते. पण आता यावरून आंदोलक शेतकऱ्यांनी आपली भूमीका स्पष्ट केली असून केंद्र सरकारने त्यांच्याशी आधी चर्चा करावी, अशी मागणी केली आहे. तसेच जर केंद्राने त्यांच्याशी चर्चा केली तर ते वैद्यकीय उपचार घेण्यास तयार आहेत असेही सुनावणी दरम्यान माहिती दिली आहे. ही सुनावणी न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती सुधांशू धुलिया यांच्या विशेष रजा खंडपीठासमोर झाली. यावेळी न्यायालयाने पंजाब सरकारला डल्लेवाल यांना वैद्यकीय मदत देण्याच्या सूचनांचे पालन करण्यासाठी आणखी वेळ दिला आहे. यावेळी पंजाब सरकारचे ॲडव्होकेट जनरल गुरविंदर सिंग यांनी, सरकारची बाजू मांडताना, सरकारचे प्रतिनिधी आणि वैद्यकीय पथक आंदोलनाच्या ठिकाणी गेले होते. आम्ही न्यायालयाच्या निर्देशाचे पालन केले आहे आणि करत आहोत. पुढेही निर्देशाचे पालन केले जाईल असा दावा केला आहे. तर सोमवारी (दि.३०) झालेल्या पंजाब बंदच्या पार्श्वभूमीवर पंजाब सरकारला आणखी तीन दिवसांचा अतिरिक्त वेळ देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी एजी म्हणाले, आंदोलनामुळे सोमवारी वाहतूक कोंडी झाली होती. तरिही आमचे पथक आंदोलनास्थळी पोहचले. यावेळी केंद्र त्यांच्याशी बोलण्यास तयार असेल तरच डल्लेवाल वैद्यकीय मदत घेतील, असा प्रस्ताव आंदोलकांनी दिला. यावरून न्यायालयाने पुन्हा एकदा सरकारला खडे बोल सुनावत, याचा आमच्याशी काही संबंध नाही. आम्ही तुम्हाला सूचनांचे पालन करण्याचे आदेश दिले आहेत. सध्या जे सुरू आहे, त्यावर न्यायालय भाष्य करू शकत नाही, असे म्हटले आहे. तर आता यावर सुनावणी २ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे. न्यायालयाने पंजाबचे मुख्य सचिव आणि डीजीपी यांना हजर राहण्याचेही आदेश दिले आहेत.

-------------

### शरण आलेल्या वाल्मिक

देशमुख यांच्या फरारी मारेकऱ्यांना अटक करण्यात पोलिस यंत्रणेला अपयश आलेले आहे. वाल्मिक कराड आणि अन्य आरोपींची अटक कधी होणार, आरोपांच्या अटकेला इतका का वेळ लागतोय असा सवाल देशमुख यांच्या कुटुंबियांकडूनही उपस्थित करण्यात येत होता. पोलिसांकडून आरोपिंना पकडण्यासाठी पथकांची स्थापना करण्यात आली आहे मात्र अजुनही त्यांच्या हाती काही लागलेले नाही. त्यातच वाल्मिक कराड हा स्वतःहून पोलिसांना शरण येणार असल्याची चर्चा सुरु झाली. मात्र दोन दिवसात वाल्मिक कराड हा कधी आणि कोठे शरण येणार याबाबत माहिती मिळत नव्हती. परंतु मंगळवारी सकाळी अखेर सोशल मिडीयावर वाल्मिक कराड यांनी स्वतःचा एक व्हिडीओ जारी करत आपण पुणे येथील सीआयडी कार्यालयात शरणागती स्विकारणार असल्याचे जाहिर केले. त्यानुसार वाल्मिक कराड यांनी साधारणत दुपारी १२:.३० वाजता पुणे येथील सीआयडी कार्यालयसमोर येत शरणागती स्विकारली. त्यानंतर सीआयडीच्या पथकाने वाल्मिकी कराड यांना तब्यात घेतले. त्यांची वैद्यकीय तपासणी करून सीआयडी पथक हे केजकडे रवाना झाले. रात्री १० वाजल्याच्या सुमारास केज येथे त्यांची सुरूवातीला वैद्यकीय चाचणी करण्यात आली आणि त्यानंतर केज पोलिस ठाण्यात नेण्यात आले. त्या ठिकाणी तांत्रिक बाबी पुर्ण करून त्यांना न्यायालयात नेण्यात आले. न्यायालयाकडे पोलिसांकडून सहा दिवसांची पोलिस कोठडी मागितली जाणार असल्याचा अंदाज व्यक्त होत होता. हे वृत्त लिहिपर्यंत कराड यांच्या कोठडीबाबतची माहिती कळू शकली नाही.

-------------

### मंत्रालयातील चौथा मजला पाच

चौथ्या मजल्यावर ४०३ क्रमांकाचे दालन मिळाले आहे. योगायोग असा की, २०१४ ते १९ याकाळात ग्रामविकास मंत्री असताना त्यांचे याच ठिकाणी दालन होते, तेच दालन त्यांना आता मंत्री झाल्यावर मिळाले आहे हे विशेष! ना. पंकजाताई मुंडे आज दुपारी मंत्रालयातील दालनात येण्यापूर्वीच लोकांनी त्यांना भेटण्यासाठी मोठी गर्दी केली होती. यात प्रशासकीय अधिकारी, आमदार, लोकप्रतिनिधींसह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते त्यांना कार्यक्रमाचे निमंत्रण व शुभेच्छा देण्यासाठी आले होते. या सर्वांच्या सदिच्छांचा स्विकार त्यांनी केला. याशिवाय राज्याच्या विविध भागातून बरीच मंडळी आपल्या समस्या घेऊन आली होती. ना. पंकजाताईंनी नेहमीप्रमाणे सर्व नागरिकांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांच्याशी संवाद साधला व त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निपटारा केला.

-------------

### आता विशेष सहाय्याच्या योजनांच

सह्याद्री अतिथीगृह येथे सामाजिक न्याय विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. या बैठकीस आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पाणीपुरवठा आणि स्वच्छता राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि प्रमुख अधिकारी उपस्थित होते. विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मिळण्यासाठी योजनांच्या सध्याच्या अटी व शर्तींमध्ये सुधारणा करण्यात याव्यात. शासकीय वसतीगृह इमारतींची जिथे आवश्यक असेल तिथे तात्काळ दुरुस्ती करून घेण्यात यावी. वसतीगृहातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सर्व सोई सुविधा वेळेवर मिळतील याची खात्री करावी. तसेच वसतीगृहाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन करावी. जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करावी. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेसाठी पोर्टल लवकरात लवकर सुरू करावे. विभागांतर्गत येणाऱ्या सर्व महामंडळासाठी एक एस.ओ.पी तयार करण्यात यावी, असे निर्देश यावेळी फडणवीस यांनी दिले.

------------

### नवीन वर्षात बीड जिल्ह्याचे आकाश

आहेत त्याप्रमाणे अधिकारीही जबाबदार आहेत. सुरुवातीपासून या सर्व धंद्यावर जर कटाक्ष ठेवला असता आणि अवैध व्यवसाय होणारच नाहीत याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले असते तर ही वेळ आली नसती .बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री होते. यावर पोलीस नियंत्रण आणू शकतात. याशिवाय मोठ्या प्रमाणात वाळू माफिया आणि अवैध वाळूची विक्री जोरात सुरू आहे यावर महसूल विभाग बंधने आणू शकतो. महसुल विभागाने ठरविले तर नियमापेक्षा एक ब्रासही वाळू जास्त जाणार नाही. मात्र असे होत नाही. त्यामुळे यांची मजल एवढी वाढली की जिल्हाधिकाऱ्यांच्या अंगावर गाडी घालण्या ईतपत त्यांची मजल गेली तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे आणि विद्यमान जिल्हाधिकारी अविनाश पाठक या दोघांना याचा अनुभव आलेला आहे. यापूर्वी पोलीस अधीक्षक जे काम करत होते. त्या कामाची पद्धत आता बदलली पाहिजे नवीन पोलीस अधीक्षक नवनीत कावत सारखे तरून आयपीएस अधिकारी आहेत. ते बीड जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करू शकतात. पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वरिष्ठांचे पाठबळ मिळाले तर जिल्ह्यात पुन्हा एकदा शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखली जाण्यास मदत होणार आहे. जिल्हा परिषदेमध्ये चाललेला भ्रष्टाचार हा ताळ्यावर आणायचा असेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जिवने यांनी प्रयत्न केले पाहिजेत. जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी अनित्य जिवने,पोलीस अधिक्षक नवनित कावत या तिघांनी जर एकत्रित प्रयत्न केले तर हा जिल्हा पुन्हा एकदा चांगल्या पद्धतीने उभा राहील. आणि अवैध धंदे बंद झाले तर जिल्ह्यातील अशांतताही संपुष्टात येईल कारण अवेध धंद्यामध्ये जिल्ह्यातील अशांततेचे मूळ आहे. ज्यावेळी भ्रष्टाचार आणी आवेध धंदे बंद होतील तेव्हा जिल्हा चांगल्या पद्धतीने सुरळीत काम करेल. या जिल्ह्यामध्ये केवळ गुंडगिरी आणि दहशत एवढीच प्रतिमा बाहेर आहे. मात्र या जिल्ह्यांमध्ये चांगले काम करणारे खूप लोक आहेत. अगदी क्रिकेटमध्ये, प्रशासनामध्ये, शेतकऱ्यांमध्ये ,कर्मचाऱ्यांमध्ये अधिक चांगले लोक या जिल्ह्यामध्ये आहेत. मात्र याची चर्चा फार होत नाही. चर्चा होते ती केवळ अवैध धंदे, भ्रष्टाचार आणि गुंडगिरीची ही चर्चा होणारच अनेक जण म्हणतात जिल्ह्याला बदनाम करू नका मात्र एकदा सर्व बाबीतुन जिल्हा मुक्त होईल त्याचवेळी जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था सुरळीत होईल. आणि जिल्ह्याचे नाव पुन्हा एकदा राजकीय पटलावर , सामाजिक पटलावर आणि आर्थिक पटलावर चांगल्या गोष्टीसाठी पुढे येईल. या जिल्ह्यांमध्ये अनेक शेतकरी विक्रमी उत्पादन घेणारे आहेत. या जिल्ह्यामध्ये अनेक चांगले अधिकारी आहेत ,या जिल्ह्यामध्ये अनेक चांगले कर्मचारी आहेत, मात्र त्यांना पाठबळ मिळाले तर ते चांगले काम करू शकतात .यावर आमचा विश्वास आहे. जिल्ह्यातील वातावरण पुन्हा एकदा स्वच्छ व्हावे आणि जिल्हा पुन्हा एकदा शांतता आणि सुव्यवस्था अबाधित असलेला जिल्हा व्हावा एवढीच माफक अपेक्षा .आणि ज्यांची ही जबाबदारी आहे त्यांनी जर जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली तर हे शक्य आहे.

------------

### ७ जानेवारीपर्यंत

सातारा, सांगली, कोल्हापूर, आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश भागांमध्ये हवेत गारवा अनुभवता येणार आहे. मध्य महाराष्ट्रावर मात्र पुढील ४८ तासांमध्ये चक्राकार वाऱ्यांचा प्रभाव दिसणार असून, त्यामुळे थेट कोकण किनारपट्टीवर याचे परिणाम होताना दिसतील. तिथे, पावसाळी ढगांची दाटी असेल. राज्यात गेल्या आठवडाभरापासून संमिश्र वातावरण पाहायला मिळत आहे. मागील आठवड्यात राज्यावर अवकाळी पावसाचे सावट होते. या काळात मुसळधार पावसासह काही भागात गारपीट देखील झाली. आता हवामानात बदल होणार असून राज्यातील अवकाळी पावसाचे संकट दुर होणार आहे. हवामान विभागाच्या अंदाजानूसार २ जानेवारीपर्यंत ऊबदार वातावरण हळूहळू कमी होत जाणार आहे. त्यानंतर ७ जानेवारीपर्यंत पुन्हा संपुर्ण महाराष्ट्रात थंडीची लाट येईल.

------------

### टी.सी.हरवला आहे

शिलादेवी बापूराव गायकवाड या नावाचा १२ वी पासचा टी.सी. पाली ते बीड बस प्रवासामध्ये हरवला आहे. ज्या कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधा.

संपर्क:: मो.९५०३०२७७३१

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि.०१ जानेवारी २०२५


## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियान प्रस्तावासाठी ५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

बीड :- राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा या स्पर्धेचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करणे तसेच अभियान व स्पर्धेशी संबधित सर्व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले असून या पोर्टलच्या संकेतस्थळाची लिंक ... अशी आहे. दि. २/२/२०२१ च्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या स्पधेसाठी सर्व स्तरावर प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दि. १६ ते ३१ ऑक्टोबर २०२४ होती. या कालावधीत वाढ करुन दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारण्यास मुदतवाढ दिली आहे. स्पर्धेत सहभाग घेण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी राज्यस्तरावर त्याचप्रमाणे विभागीय,महानगरपालिका व तालुका स्तरावर स्पर्धेचे अर्ज परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंतच्या कालावधीत ऑनलाईन () पध्दतीने पाठविण्याच्या सूचना सामान्य प्रशासनाचे उपजिल्हाधिकारी शैलेस सुर्यवंशी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिल्या आहेत. या प्रस्तावावर शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तरी इच्छुकांनी वरील मुदतीत ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत.

# स्मार्ट रेशनकार्ड स्थलांतरीत कामगारांना प्राधान्याने द्या -मुख्यमंत्री

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या कामांचा आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**

**स्थलांतरित कामगारांवर लक्ष केंद्रीत करून त्यांना स्मार्ट रेशनकार्ड देण्यात यावे. त्याचबरोबर स्मार्ट कार्ड देताना ते कुठल्याही राज्यातील असले तरी त्यांना महाराष्ट्रात कुठल्याही रास्त-भाव दुकानात धान्य मिळेल, असे नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

सह्याद्री अतिथीगृह येथे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला.

अन्नधान्य वाटपामध्ये लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात धान्य वाटप व्हावे यासाठी सर्व रास्त भाव दुकानांमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काटे बसवावेत, सर्व शिधापत्रिका धारकांना स्मार्ट शिधापत्रिकांचे वितरण करण्यात यावे. लाभार्थ्यांना वेळेत अन्नधान्याचे वितरण होण्याच्या दृष्टीने 'एक गाव एक गोदाम' उभारण्याची कार्यवाही सुरू करावी. वाहनांचे जिओ टॅगीग करावे, अन्नधान्य वाटपामध्ये 'एक देश एक शिधापत्रिका' धोरण राज्यात राबवण्यात येत आहे. त्याअनुषंगाने स्थलांतरित मजुरांना अन्नधान्य वाटपामध्ये प्राधान्य देण्यात यावे. गरजू लाभार्थ्यांचा सण उत्सव उत्साहात साजरा व्हावा यासाठी राज्यात



सणांच्या काळात आनंदाचा शिधा वाटप करण्यात येतो. या वाटपाची एक दिनदर्शिका तयार करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

आगामी वर्षात २५ लक्ष नवीन लाभार्थ्यांचे सार्वजनिक वितरण यंत्रणेसाठी समावेशन करून त्याचे ई-केवायसी करून प्रमाणीकरण करण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, मागील ६ महिन्यात एकदाही अन्नधान्याची उचल न केलेल्या शिधापत्रिकांची तपासणी करावी, शिधापत्रिकामधून मयत व्यक्ती वगळाव्या, १०० पेक्षा जास्त वय असणाऱ्या लाभार्थ्यांची फेरतपासणी करावी. तसेच संगणकीकृत न झालेल्या १४ लक्ष लाभार्थ्याचे नाव शिधापत्रिकेत समाविष्ट करण्याकरिता विशेष मोहीम राबविण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

या बैठकीस अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव संजय सेठी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, सचिव विरेंद्र सिंह, सचिव रविंद्र सिंह, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# अंबाजोगाई जिल्हा निर्मितीची घोषणा करून विकासकामांना मंजुरी द्यावी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई जिल्हा निर्मितीची घोषणा करून विविध विकासकामांना मंजुरी द्यावी अशा मागण्या समाजवादी पार्टीच्या वतीने राज्याच्या मुख्यमंत्र्यांना उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत मंगळवार, दिनांक ३१ डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

समाजवादी पार्टीच्या वतीने प्रदेश सचिव तथा बीड जिल्हा प्रभारी ऍड.शिवाजी कांबळे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सालेहा जिलानी शेख, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष जिलानी शेख, शहराध्यक्ष राजेश मातादीन परदेशी, शेख शौकत यांनी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत मंगळवार, दिनांक ३१ डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अंबाजोगाई जिल्हा निर्मीतीचा प्रश्न हा मागील ३५ वर्षांपासुन प्रलंबीत आहे व त्याच बरोबर १) आशिया खंडातील सर्वांत मोठे स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय ग्रामीण रूग्णालय हे अंबाजोगाई येथे असून या ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणुक करणे, साधन सामुग्रीचा अभाव असून त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे, २) नवीन बुट्टेनाथ साठवण तलावाची निर्मीती करणे, ३) काळवटी साठवण तलावाची उंची वाढविणे, ४) नवीन एम.आय.डी.सी उभा करून रोजगार निर्मीती करणे, ५) शैक्षणिक दृष्टीकोनातून अंबाजोगाई येथे शैक्षणिक हब उभा करणे, ६) शेतकऱ्यांच्या शेती मालाला हमीभाव घोषीत करावा, ७) नवीन घाटनांदुर ते अंबाजोगाई रेल्वे मार्ग निर्माण करण्यात यावा, ८) अंबाजोगाई मध्ये विमानतळाची निर्मीती करण्यात यावी, ९) बुट्टेनाथ भागात दुध संकलन केंद्र उभा करण्यात यावे, १०) बुट्टेनाथ भागात पर्यटनासाठी उद्यान निर्मीती करणे, ११) डॉ.बाबासाहेब अंबेडकर विद्यापीठाचे उपकेंद्राची इमारत उभा करून केंद्र सुरू करण्यात यावे, १२) अंबाजोगाई शहरात नगरपरीषदेच्या सांस्कृतिक सभागृहाची निर्मीती करणे, १३) बचतगटाचे माध्यमातून तयार केलेल्या मालाला भाव मिळवून देणे, १४) जिल्हा परीषद शाळांचे पुनर्वसन करून चांगल्या दर्जाचे शिक्षण देणे आणि १५) साखर कारखाने सतत बंद असतात. ते सुरू करणे व शेतकऱ्यांच्या ऊसाला चांगला भाव मिळवून देणे आवश्यक आहे. या सर्व मागण्या मा.मुख्यमंत्री साहेबांनी मंजुर कराव्यात अन्यथा समाजवादी पक्षाचे वतीने आंदोलन करण्यात येईल. असा इशारा ही या निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर ऍड.शिवाजी कांबळे, सालेहा जिलानी शेख, जिलानी शेख, राजेश मातादीन परदेशी, शेख शौकत, ऍड.डी.एल.केंद्रे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



समाजवादी पार्टीकडून मुख्यमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन

# आनंद नगरीत विद्यार्थ्यांनी लुटला आनंद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील खोलेश्वर प्रा. विद्यालयाच्या प्रगती विभागात बाल आनंद नगरी उपक्रम उत्साहात संपन्न झाला.

या प्रसंगी डॉ.सुप्रिया सोलनकर,खोलेश्वर मा. विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबुराव आडे,प्रा.वि.चे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे,विभाग प्रमुख वर्षाताई मुंडे,प्रा.वि.शालेय समिती अध्यक्ष उन्मेष मातेकर,मा.वि.शालेय समिती अध्यक्ष डॉ. अतुल देशपांडे, केंद्रप्रमुख उत्तरेश्वर मिटकरी,पालक प्रतिनिधी सुषमा सोळंके स्नेह संमेलन प्रमुख परमेश्वर राठोड, सहप्रमुख अनुजा गुड्डे आदी उपस्थित होते.



डॉ.सोलनकर म्हणाल्या की,बालआनंद मेळाव्यातून शिक्षणासोबतच आनंद घेत ज्ञान व प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण मिळते व अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायाबद्दलच्या संकल्पना स्पष्ट होतात. व्यवसायाची मांडणी, व्यवहाराची शिकवण,संवाद कौशल्य यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे सांगून विद्यार्थ्यांच्या स्टॉलला भेट देऊन कौतुक केले. उन्मेष मातेकर,वर्षा मुंडे, उत्तरेश्वर मिटकरी यांच्यासह पालकांनी या उपक्रमास शुभेच्छा देऊन आनंद व्यक्त केला. भारत माता, राष्ट्रमाताअहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार,दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली.बाल आनंद नगरीत जवळपास एकशे अठरा विद्यार्थ्यांचे खाद्यपदार्थाचे स्टॉल होते.

## महाराष्ट्र टेक्नकिल-टेक्सटाईल मिशनची स्थापना करा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात टेक्नकिल टेक्सटाईल मिशन ()ची स्थापना करणे, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळाची () स्थापना करणे, नवी दिल्ली येथे आयोजित भारत टेक्स २०२५ मध्ये सहभाग घेणे, टेक्निकल टेक्सटाईल पार्कसाठी अभिरूची पत्रे मागविणे तसेच स्थानिक वस्त्रोद्योगासाठी कॅप्टिव्ह मार्केट योजना प्रभावीपणे लागू करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे वस्त्रोद्योग विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, हातमाग विणकरांना सामाजिक सुरक्षा कवच प्रदान करण्याच्या दृष्टीने वृध्दापकाळासाठी निवृत्ती वेतन योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. राज्याच्या एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत हातमाग विणकरांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यासाठी अर्बन हाट केंद्रांची स्थापना करण्याबाबत योजना तयार करावी. तसेच प्रसार भारती यांच्या सहकार्याने 'करघा' या पारंपरिक वस्त्रोद्योग मालिकेचा पहिला भाग प्रसारीत करावा. वस्त्रोद्योग विभागाच्या योजनांचे डिजिटायझेशन

### पुढील १०० दिवसांमध्ये वस्त्राद्योग विभागाने करावयाच्या कामाचा घेतला आढावा

आणि ऑटोमेशन करून राज्यातील सूतगिरण्यांमध्ये प्राधान्याने सौर ऊर्जेचा वापर वाढविण्यावर भर देण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीस अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव संजय सेठी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, सचिव विरेंद्र सिंह, सचिव रविंद्र सिंह, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# कर्तव्याचं पालन केल्यास आपला देश प्रगती करू शकतो - युवा उद्योजक रणजीत धस

**महाराणी ताराबाई विद्यालयात युवा उद्योजक रणजीत धस यांनी व्यवसायाच्या माध्यमातून परदेश दौरा केल्याबद्दल सत्कार संपन्न**

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील आशीर्वाद ट्रेडर्सचे सर्वेसर्वा ओनर तथा वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे युवा संचालक रणजीत मधुकरराव धस यांनी नुकताच थायलंड या देशाचा दौरा करून आल्याबद्दल महाराणी ताराबाई विद्यालयात त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम संपन्न.

याबाबत अधिक माहिती अशी की,युवा उद्योजक रणजीत भैय्या धस यांनी दि.१६ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२४ या दरम्यान ब्रिटिश पेंट कंपनीच्या वतीने परदेश दौऱ्यासाठी फुकेट थायलंड या देशासाठी निवड झाली होती तेथील पर्यटन स्थळांना भेटीदेत मायदेशी परतले आहेत त्यांचे



परदेशातील अनुभव विद्यार्थ्यांना माहिती व्हावेत यासाठी दि.३१ डिसेंबर २०२४ मंगळवार रोजी त्यांच्या सत्काराचा कार्यक्रमाचे आयोजन महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयमध्ये करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संचालक इंजि.अशोक आंधळे तसेच सत्कारमूर्ती युवा उद्योजक रणजीत भैय्या धस, विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर, उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर आदी मान्यवर म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी इंजि.अशोक भैय्या आंधळे यांनी अभिनंदन व शुभेच्छापर विचार व्यक्त करताना ते म्हणाले की,व्यवसायाच्या माध्यमातून २० परदेशी दौऱ्या दरम्यान २४ देशांचा दौरा रणजीत भैय्या यांनी केलेला आहे त्यामध्ये ७ वेळा आपल्या आई-वडिलांना परदेश दौऱ्यावर घेऊन गेले आहेत विद्यार्थी मित्रांनो आपण सुद्धा, मेहनत, जिद्द, चिकाटीच्या जोरावर शिक्षणामध्ये यशस्वी व्हावे असे विचार व्यक्त करून परदेश दौरा पूर्ण केल्याबद्दल रणजीत भैय्या यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या हस्ते गुलाल,शाल आणि पुष्पगुच्छ देऊन युवा उद्योजक रणजीत भैय्या यांचा सत्कार शिक्षक शिक्षिका यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती रणजीत भैय्या धस म्हणाले की,व्यवसायाच्या माध्यमातून दुबई, श्रीलंका, चीन, बँकॉक, सिंगापूर थायलंड यासारख्या २४ देशांचा परदेश दौरा केलेला आहे त्या देशातील स्वच्छता, नियम, इन्फ्रास्ट्रक्चर, पर्यटन स्थळे पाहिल्यानंतर वाटते की आपला देश कुठेतरी पाठीमागे आहे आपण आपल्या कर्तव्यांचे पालन केलं तर आपला देश प्रगती करू शकतो तुम्ही माझा सत्कार या ठिकाणी केला त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर यांनी केले तर सूत्रसंचालन विष्णू आंधळे सर यांनी केले व उपस्थितांचे आभार श्रीमती चांदेकर मॅडम यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**टी सी हरवला आहे**

**शिलादेवी बापूराव गायकवाड या नावाचा १२वी पास चा टीसी पाली ते बीड बस प्रवासामध्ये हरवला आहे कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधा**

**संपर्क:९५०३०२७७३१**

पान ६ वरून...

### यशवंत शेरे यास राष्ट्रीय

२०२४ संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये यशवंत नामदेव शेरे याने राष्ट्रीय स्तरावरील प्रथम पारितोषिक प्राप्त केल्यामुळे गुरुदेव परिवाराच्या वतीने त्याचा भव्य सत्कार करण्यात आला. यशवंतच्या या यशाबद्दल बनेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भागवत गोरे सचिव डॉ.नरेंद्र काळे सर्व संचालक, मुख्याध्यापिका सौ.शशिकला काकडे, यशवंतचे वडील नामदेव शेरे, श्री सूर्यकांत तेलंग श्री विजय भिसे, श्री पंडित चव्हाण, श्री बाळासाहेब शिंदे, श्री प्रकाश बोरगावकर, सौ शितल काळदाते, सौ संगीता मोरे, सौ सोनाली कोनाळे, सौ ज्योती काळे यांनी अभिनंदन केले आहे.

### येत्या प्रजासत्ताकदिनी

नाका या ठिकाणीही मोठा रस्ता होऊन बिंदुसरा नदीवरील पुलाचे कामही लवकरच पूर्ण होईल असेही बजरंग सोनवणे यांनी यावेळी सांगितले. आपल्या सहा महिन्याच्या कार्यकाळात दोन-तीन रस्त्यांना आपण मंजुरी आणलेली आहे. त्याचे टेंडर होऊन लवकरच तिही कामे सुरू होतील. असेही यावेळी बजरंग सोनवणे म्हणाले यासंदर्भात आपण केन्द्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली असल्याचे ते म्हणाले.

### मच्छिंद्रनाथाच्या समाधी मंदिराची

निघाल्याने रस्त्याच्या कामाला लगेचच गती येणार आहे आमदार धस म्हणाले की पर्यटन विभाग तीर्थक्षेत्र विकास प्रधानमंत्री ग्राम सडक योजना आधीच्या माध्यमातून २२ कोटीची विकास कामे प्रगतीपथावर आहेत लवकरच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य समाधी मंदिराची काम सुरू होणार आहे मढी वृद्धेश्वर मायंबा अशी त्रिस्थळी यात्रा नाथ भक्त पाई फिरत पूर्ण करतात मायंबा देवस्थान नाकडे येणारे सर्वच रस्ते दुपदरी होणार असून शनिशिंगणापूरच्या पूर्वीचे प्राचीन नातकालीन शनी मंदिराभोवतीचे सर्व रस्ते व तिथून पाथर्डी तालुक्यात जाणारी रस्ते सुद्धा मजबूत केले जातील मायंबा देवस्थानाचा विकास आराखडा तयार असल्याचे त्यांनी सांगितले.

### मंत्री पंकजाताई आणि डॉ.

जिल्हा रुग्णालयातील अतिशय महत्वाच्या अशा २०० खाटांच्या स्त्री रुग्णालयाच्या भव्य दिव्य इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यासाठी पंकजाताईंनी पाठपुरावा करून निधी मंजूर करून आणला आणि महत्वाचा प्रश्न मार्गी लावला. ग्रामविकास मंत्री असताना जिल्हाभरात ग्राम सचिवालये झाली. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या इमारती देखील भव्य दिव्य स्वरूपात झाल्या. प्रीतमताईंमुळे

बीडमध्ये पासपोर्ट कार्यालय झाले. पंकजाताई आणि प्रितमताई मुंडे यांनी जिल्ह्यात अतिशय पारदर्शी कारभार केलेला आहे. स्वच्छ कारभार आणि प्रभावी योजना शासनाच्या माध्यमातून राबवत दोन्ही ताईंनी प्रशासकीय पकड देखील मजबूत ठेवलेली आहे. आपल्या नेतृत्वगुणांच्या माध्यमातून लोकनेत्या पंकजाताई यांनी एक आदर्श पायंडा जिल्ह्यात निर्माण केला.याचे उत्तम उदाहरण म्हणजे बीडची रेल्वे लवकरच बीडकरांच्या दृष्टीपथात आहे. गेल्या काही वर्षांत पंकजा ताई आणि प्रितम मुंडे यांनी केलेला पाठपुरावा यामध्ये महत्वाचा ठरला आहे. येणाऱ्या काळात देखील ना. पंकजाताई मुंडे जिल्ह्यात विकासाची गंगा वाहत ठेवतील. मंत्री पदाच्या माध्यमातून जिल्ह्याला विकासाच्या उंचीवर नेवून ठेवतील असेही भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी म्हटले आहे.

### फुले मार्केट उभारणीच्या

नाईलाजाने लोकशाही पध्दतीने आंदोलन, उपोषण करावे लागेल. व्यापारी समाज शांतीप्रिय समाज आहे. व्यापार्यांचे सहनशिलतेचे अंत पाहु नये, अंतिम श्वासा पर्यंत समाजासाठी, गरजुंसाठी, व्यापार्यांच्या हितात काम करीत राहील, असे बंब म्हणाले. कॅटचे राज्य उपाध्यक्ष सतिष पंच मार्गदर्शन करताना सध्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या टॅक्नॉलाजीचा युग आहे. ऑनलाईन व्यवसाय, अंतरराष्ट्रीय मोठे-मोठे मॉल या मुळे लहान-सहान व्यवसाय करणारे संकटात सापडलेले आहे. आपल्या व्यवसायाच्या प्रगतीसाठी पारम्पारिक व्यवसायात बदल आणणे गरजेचे आहे. लोकमत मिडियाचे माजी मॅनेजर मकरंद शाहपुरकर यांनी डिजिटल आरबीट ऍप या माध्यमाने संपूर्ण जिल्ह्याची डायरेक्टरी प्रारंभ केली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक व्यापार्यांनी शाहपुरकरच्या या डिजिटल अभियानात आपली सर्व माहिती फोटो सह टाकुन नोंदणी करावी जेणे करून देश-विदेशात उद्योग व्यवसाय संदर्भात माहिती मिळेल. व्यापार्यांच्या अडी-अडचणेत सदैव सहकार्य करु असे पंच म्हणाले. डिजिटल आरबीटकॉप चे सुत्रधार शाहपुरकर मार्गदर्शन करताना सर्व व्यवसाय काळानुसार बदलत आहे. त्या अनुषंगाने आपला व्यवसाय व संघटनेचे कार्य अधिक भक्कमपणे पुढे नेण्यासाठी सर्व व्यापार्यांनी डिजिटल आरबीट डॉऊनलोड करून आपली स्वतःची व व्यवसायाची नोंदणी करावे, असे शाहपुरकर म्हणाले. मराठवाड्याचे सचिव सुखदेव बजाज यांनी आपले विचार मांडले. डिजिटल अभियानाचे नोंदणी फॉर्म वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जगदीश अग्रवाल, दुर्गा लड्ढा, बाळा शेळके, कैलास मल्लावत, संतोष मुंदडा, पुरुषोत्तम सोसे, बालाजी लताड, अब्बास खाँ, पुंजा शेळके, सुभाष सोनुने, पवन अग्रवाल, सचिन गिल्डा आदिनी परिश्रम घेतले. सभेचे सुत्र संचालन व आभार गोविंद साखला यांनी मांडले.

### पुरस्कार मिळाल्याबद्दल

यावेळी पसायदान सेवा प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे आणि दैनिक लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे यांच्या हस्ते त्यांचा पुरस्कार मिळाल्याबद्दल गौरव करण्यात आला.या कार्यक्रम प्रसंगी माजलगाव तलाठी संघटनेचे अध्यक्ष रूपचंद आभारे, तलाठी लक्ष्मण सोन्नर, तलाठी सुरेश भारती, तलाठी सचिन बडे, बळीराम थापडे, अशोक थापडे, श्रीराम थापडे, बालाजी थापडे, अंकुश थापडे, कांताराम थापडे आदींची उपस्थिती होती.


### सावित्रीमाई फुले

३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८ वाजता कै.गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळेत ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास अभिवादन करून जयंती उत्सव सोहळ्यास प्रारंभ करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता अभिवादन बाईक रॅली काढण्यात येईल. ही रॅली साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चौक, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रणवीर तानाजी मालुसरे चौक, पाटील चौक, गुरूवार पेठ सिमेंट रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे निघून ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले चौक येथे रॅलीचा समारोप होईल. या सर्व चौकातील नामफलकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येईल. त्यानंतर सायंकाळी ६. ३० वाजता महात्मा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले आदर्श माता पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजातील आदर्श शिक्षक भागवतराव मसने, चि.प्रसाद भागवतराव मसने, कृष्णा शिवाजीराव जिरे, कु.ईश्वरी रामेश्वर खाडे या गुणवंतांचा गुणगौरव करण्यात येईल. त्यानंतर प्रा.डॉ.योगेश सुरवसे यांचे आपल्यासाठी सावित्रीमाई या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान होईल. हे सर्व कार्यक्रम स्वयंवर मंगल कार्यालय, संत सावता माळीनगर या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहेत. ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले जयंती उत्सवाच्या यशस्वितेसाठी आयोजक प्रकाश बलुतकर, विष्णु राऊत, अंकुश घोडके, संतोष राऊत, बालासाहेब मसने, नितीन जिरे, शरद माळी, राम घोडके, मंगेश बलुतकर, पंकज राऊत, नंदकुमार बलुतकर, अभिजीत जिरे, पवन जिरे, पवन घोडके, कृष्णा मसने, अनिकेत घोडके, आकाश चोपने, श्रीनिवास मसने, नवनाथ माळी, बालासाहेब माळी, अमोल जिरे, निवृत्ती जिरे, सिद्राम पाथरकर, विशाल पाथरकर, सिद्राम घोडके, प्रविण चोपने, दिनेश घोडके, अशोक बलुतकर, ऋषि पाथरकर आदींसह महात्मा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला आहे.

# कांद्याला एक रुपया भाव; शेतकऱ्याने खिशातून घातले ५६५ रुपये!

सोलापूर : निर्यात बंदीमुळे झालेल्या कांदा दर घसरणीनंतर शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती झाली असून, आता त्यांना उत्पादन खर्च मिळणेही मुश्किल झाले आहे. राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या बीड जिल्ह्यातील नेकनूर या गावातील एका शेतकऱ्याने साडे चार क्विंटल (४४३ किलो) कांदा सोलापूर बाजार समितीत नेला असता, या शेतकऱ्याला ५६५ रुपये खिशातून द्यावे लागल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे आता या घटनेनंतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

बीड जिल्ह्यातील नेकनूर येथील कांदा उत्पादक शेतकरी श्रीराम शिंदे यांचा मुलगा वैभव शिंदे मागील आठवड्यात सोलापूर बाजार समितीत आपला साडे चार क्विंटल (४४३ किलो) कांदा विक्रीस घेऊन गेला होता. यामध्ये त्यांचा ३४५ किलो गोल्टी कांदा तर ९८ किलो हा मोठा कांदा होता. मात्र, गोल्टी कांदा हा बाजार समितीने मागणी नसल्याचे म्हणत खरेदी केला नाही. तर मोठा कांदा हा केवळ



एक रुपये प्रति किलो दराने खरेदी करण्यात आला. त्यामुळे त्यांनी बाजार समितीत आणलेल्या एकूण कांद्याला केवळ ९८ रुपये मिळाले तर गोल्टी कांदा तसाच बाजार समितीत त्यांना सोडून द्यावा लागला. या एकूण ४४३ किलो कांद्यासाठी गाडी भाडे आणि सर्व बाजार समिती तोलाई-वाराई खर्च मिळून ६६३ रुपये खर्च आला. त्यातून ९८ रुपये कांद्याचे झालेले पैसे वजा जाता, शेतकरी वैभव शिंदे यांनाच खिशातून ५६५ रुपये देऊन गाडी भाडे आणि अन्य खर्चासाठी व्यापाऱ्याला द्यावे लागले आहे. शेतकरी वैभव शिंदे या प्रकाराबाबत बोलताना म्हटले आहे की, आपली ७ एकर जमीन असून, आपण त्यातील दोन एकरमध्ये कांदा लागवड केली होती. त्यासाठी आपल्याला लावणीचा खर्च ७० हजार रुपये इतका आला असून, यावर्षी कांद्याला चांगला दर मिळेल या आशेने कांदा लागवड केली. मात्र सोलापूर बाजार समितीत कांदा विक्रीला नेला असता. त्याला केवळ एक रुपया प्रति किलो दर मिळाला आहे. तर गोल्टी कांदा हा बाजार समितीकडून खरेदी देखील करण्यात आला नाही. त्यामुळे पदरी काहीच पडले नाही. उलट आडत दुकानदाराला खिशातून ५६५ रुपये द्यावे लागले आहे.

## अशी करा फळबागांची यशस्वी लागवड

फळबागेसाठी जमिनीची निवड:-

फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमीन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत, मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे, त्या ठिकाणच्या मातीचे परीक्षण करून घेणे आवश्यक आहे.



माती परीक्षणासाठी मातीचा नमुना

फळबागेकरिता मातीचा नमुना घेताना जमिनीच्या प्रकारानुसार प्रातिनिधिक नमुना घ्यावा. सर्वप्रथम ३ बाय ३ बाय ३ फूट खोलीचा (१०० से.मी.) किंवा मुरूम लागेपर्यंत खड्डा करून पृष्ठभागापासून प्रत्येक फुटातील प्रातिनिधीक नमुना काढावा व तो वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये भरून तपासणीसाठी पाठवावा. माती परीक्षणाप्रमाणेच पाण्याची तपासणी करणे आवश्यक आहे. आपले विहिरीचे/बोअरचे पाणी क्षारयुक्त वा मचूळ असू नये ते गोड असावे. तेव्हा माती बरोबरच, पाण्याचेही रासायनिक परीक्षण करून घ्यावे आणि त्या अनुषंगानेच फळझाडांची निवड करावी.

फळबागेसाठी पाण्याची उपलब्धता:-

कोरडवाहू फळपिकाना लागवडीच्या सुरुवातीस पहिली तीन ते चार वर्ष पाण्याची, चांगल्या व समाधानकारक वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते. नारळ, सुपारी, केळी, पपई, चिकू मसाला पिके यांना इतर फळझाडांपेक्षा जास्त पाणी लागते. तसेच फळझाडांवरील कीड व रोगाच्या नियंत्रणाकरिता आवश्यक फवारणीसाठी पाण्याची आवश्यकता असते. म्हणून पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळझाडांची निवड करावी. आपल्याकडे १२ महिने पाण्याची सोय असेल तर ज्या फळझाडांना बाराही महिने पाणी लागते अशा फळझाडांची निवड करावी. आपल्याला पाणी आठ महिने पुरत असेल तर पेरू सारखी फळझाडे लावावीत.

हवामानानुसार फळपिकांची लागवड:-

महाराष्ट्रातील हवामान फळबाग लागवडीसाठी खूपच अनुकूल आहे. यामुळे हवामानाच्या बाबतीत फळबाग लागवड करताना शेतकऱ्यांना फारसा विचार करावा लागत नाही. आपल्या राज्याचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रात आंबा, केळी, चिकू, पपई, नारळ अशा प्रकारची फळझाडे घ्यावीत. पूर्वेकडील उष्ण व कोरड्या हवामानात संत्रा, मोसबी, कागदी लिंबू, पेरू, द्राक्षे, डाळिंब यासारखी फळझाडे घ्यावीत. कोकणासारख्या अति पावसाच्या भागात चिकू, नारळ, फणस, आंबा न काजू यासारखी फळझाडे घ्यावीत. अति कमी पावसाच्या भागात बोर,सीताफळ, आवळा, चिंच अशी कोरडवाहू फळझाडे घ्यावी. हवामानानुसार फळझाडांची लागवड न केल्यास फळे न येणे, फळे लागल्यास फळांची प्रत खालावणे, उशिरा फळे लागणे, रोग व किडींचा प्रादुर्भाव इत्यादी समस्या भेडसावतात म्हणून हवामानानुसार फळझाड लागवड करावी.

## हिवाळ्यात न्यूमोनियापासून करा जनावरांचे संरक्षण

हिवाळ्यात केवळ माणसालाच नाही तर जनावरे आणि पिकांना देखील थंडीचा त्रास होत असतो. थंडीच्या दिवसांत पडणाऱ्या दवामुळे पिकांच्या पानांवर एक बर्फ स्वरूपात एक थर जमा होतो. तर जनावरांच्या आरोग्यावर देखील दव आणि थंडीचा परिणाम दिसून येत असतो. ज्यामुळे या काळात जनावरांना अनेक आजार बळावण्याची शक्यता असते. या दवांमुळे जनावरांना न्यूमोनिया हा आजार होण्याची दाट शक्यता असते.

न्यूमोनिया हा आजार प्रामुख्याने जनावरांना फुफ्फुसांच्या संसर्गामुळे होतो. तो कोणत्याही जनावराला होऊ शकतो. थंडीच्या काळात हवेमध्ये असलेले जिवाणू आणि विषाणू श्वासाद्वारे जनावरांच्या फुफ्फुसात जातात. जर एखाद्या जनावराला आधीच फुफ्फुसाचा आजार, हृदयविकार असा कोणताही आजार झाला असेलतर तर त्या जनावराला सध्याच्या थंडीच्या वातावरणात गंभीर संसर्ग होण्याचा धोका असतो. जनावरांना होणाऱ्या या संसर्गालाच न्यूमोनिया असे म्हणतात.

श्वास घेण्यास अडथळा निर्माण होतो : न्यूमोनिया या आजारामुळे जनावराचे एका बाजूचे किंवा दोन्ही बाजूचे फुफ्फुसे कफने भरली जातात. अशा परिस्थितीत जनावरांना फुफ्फुसांच्या माध्यमातून ऑक्सिजन घेण्यास त्रास होऊ लागतो. जीवाणू पासून झालेल्या न्यूमोनियामुळे होणारा जनावरांचा हा त्रास दोन ते चार आठवड्यात बरा केला जाऊ शकतो. तर विषाणूमुळे होणारा न्यूमोनिया बरा होण्यास जास्त वेळ लागू शकतो.



न्यूमोनियाची लक्षणे?

लहान जनावरांमध्ये न्यूमोनियाची कोणतीही लक्षणे दिसून येत नाही. त्यामुळे अशा थंडीच्या परिस्थितीत लहान जनावरे आजारी असल्यास त्यांना न्यूमोनिया झालेला असू शकतो. समजा जनावराला सर्दी, खूप ताप, खोकला, थरथर कापत असेल तर ही न्यूमोनियाची सर्वसामान्य लक्षणे मानली जातात. याशिवाय जनावरांमध्ये अंगदुखी, स्नायू दुखणे, श्वास घेण्यास त्रास होणे अशा गोष्टी दिसून येत असतील तर ही सुद्धा जनावरांना होणाऱ्या न्यूमोनियाची लक्षणे आहेत.

असे करा संरक्षण

जनावरांचा गोठा या नेहमी स्वच्छ ठेवावा. जनावरांच्या गोठ्यामध्ये सूर्याची किरणे पडतील किंवा हवा खेळती राहील अशी गोठ्याची रचना असावी. जनावरांना नेहमी गरम वातावरणासाठी ठेवण्यासाठी त्यांना बारदानाने पाठीवर झाकण्याची व्यवस्था करावी. जनावरांमधील न्यूमोनियाचा इलाज हा डॉक्टरांच्या देखरेखी खाली घरच्या घरी केला जाऊ शकतो. सामान्यतः डॉक्टरांच्या सल्ल्याने तोंडाद्वारे दिल्या जाणाऱ्या प्रतिजैविकांचा वापर करावा. यामध्ये प्रामुख्याने टेट्रासाइक्लिन सारखे प्रतिजैविक हे १५-२० मिलीग्रॅम/किलोग्रॅम वजनाच्या तुलनेत द्यावे. याशिवाय स्ट्रोटोपेनिसिलिन हे जनावरांच्या वजनाच्या तुलनेत मिलीग्रॅम/किलोग्रॅम यासोबतच क्लोक्सासिलिन ७-१० मिलीग्रॅम युक्त औषधे देणे गरजेचे असते. डेक्सामेथासिनसारखे स्टिरॉइड मोठ्या जनावरांना ५ मिली तर लहान जनावरांना २-३ मिली इतक्या प्रमाणात द्यावे. एंटीहिस्टामाइन आणि एनाल्जेसिक आवश्यकतेनुसार डॉक्टरांच्या सल्ल्याने द्यावे.

## रब्बीत असे करा चारा पीक नियोजन व लागवड

आपल्याकडील जनावरांसाठी आवश्यक असलेल्या चाऱ्याचे पूर्व नियोजन केल्यास जनावरांना वर्षभर पुरेसा हिरवा व वाळलेला चारा तसेच एकदल व द्विदल चारा पुरविता येईल. वर्षभर जनावरांना सकस चारा पुरविण्यासाठी खालिलप्रमाणे हंगामानुसार चारा लागवड करावी.

मका : या पिकाची वाढ उष्ण व कोरड्या हवामानात चांगली होते. हलक्या जमिनीत पिकाची वाढ समाधानकारक होत नाही. त्यामुळे मका या पिकासाठी मध्यम ते भारी जमीन आवश्यक आहे. पेरणीपुर्वी एक खोल नागरट, दोन कुळवाच्या पाळया द्याव्यात. पेरणी खरीप हंगामात जून जुलै, रब्बी हंगामात ऑक्टोबर नोव्हेंबर उन्हाळी हंगामात फेब्रुवारी-मार्च या महिन्यात पाभरीच्या सहाय्याने दोन ओळीत ३० सें. मी. अंतर ठेऊन पेरणी करावी, बियाणे- मका लागवडी करता हेक्टरी ७५ किलो बियाणे लागते.

ज्वारी (कडवळ) : या पिकासाठी पोषक असे उष्ण व कोरडे हवामान आवश्यक आहे. काळी कसदार पण योग्य निचरा होणारी जमीन ज्वारी पिकास जास्त लाभदायक ठरते. चा-याचे पिक म्हणुन तीनही हंगामात ज्वारीची पेरणी करता येते. दोन ओळीतील अंतर २५-३० सें.मी. ठेवून पाभरीने ५ ते ७ सेमी. खोलवर पेरावे.

संकरित नेपिअर : या पिकास कसदार, मध्यम ते भारी व चांगली निचरा होणारी जमीन आवश्यक आहे. एक खोल नांगरट, तीन ते चार कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशित करावी.



मारवेल : मारवेल हे गवत वर्गीय चारा पिक आहे. ते जमिनीची धूप थांबवण्यासाठी उपयुक्त असल्यामुळे ते शेताच्या बांधावर देखील लावता येते. तसेच हे पिक काही काळ पाण्याशिवायही तग धरु शकते. मारवेल गवताची एकदा लागण केल्यास उत्तम व्यवस्थापनात सलग ४ ते ५ वर्षे उत्पादन घेता येते. चवळी : चवळी पिकाच्या चाऱ्यापासुन जनावरांना मोठ्या प्रमाणात नत्र व स्फुरद उपलब्ध होते. जमिनीला नत्र मिळते व जमिनीचा पोत सुधारतो. हवामान उष्ण व कोरडे मानवते, मध्यम ते भारी व योग्य निचरा होणारी जमीन अवश्यक आहे. योग्य प्रमाणात खतांचा वापर केल्यास हलक्या जमिनीतही चांगले उत्पादन घेता येते.स्टायलो : स्टायलो हे द्विदल वर्गीय चारा पिक आहे. हे कमी उंचीचे, लागण करण्यास सोपे व जमिनिचा पोत सुधारण्यास मदत करणारे आहे. विशेष बाब म्हणजे या पिकापासून जनावरांना १२-१४ टक्के प्रथिने मिळतात. जमीन हलकी ते मध्यम, योग्य निचरा होणारी जमीन असावी.

लसूणघास : हे द्विदल वर्गीय चारा पिक आहे. हे दिसावला मेथीच्या भाजीसारखे असते. या पिकापासुन मिळणारा चारा लुसलुसीत आसतो व त्यापासुन मिळणाऱ्या प्रथिने (१९ ते २२ टक्के) व इतर अन्न घटकामुळे तो दुभत्या जनावरांना चागला मानवतो. तसेच हे पिक जमिनी आरोग्यासाठीही चांगले आहे. जमीनीत नत्राचे प्रमाण वाढून जमिन सुपीक होते.




### जागतिक दिवस:
### नववर्ष दिन
### जागतिक शांतता दिन
### जागतिक कौटुंबिक दिवस

### महत्वाच्या घटना

१७५६ : निकोबार बेटे डेन्मार्कच्या ताब्यात गेली आणि त्यांना 'न्यू डेन्मार्क' असे नाव देण्यात आले.
१७८५ : डेली यूनिवर्सल रजिस्टर म्हणजेच टाईम्स ऑफ लंडन ने आजच्या दिवशी पहिला अंक प्रकाशित केला होता.
१८०८ : यू. एस. ए. मध्ये गुलामांच्या आयातीस बंदी घालण्यात आली.
१८१८ : भीमा कोरेगाव येथे एफ. एफ. स्टाँटन यांच्या नेतृत्वाखाली फक्त ५०० सैनिक असलेल्या दुसऱ्या बॉम्बे नेटिव्ह इन्फंट्री बटालियनने पेशव्यांच्या २५,००० सैन्याचा पराभव केला.
१८४२ : बाबा पद्मनजी यांचे 'ज्ञानोदय' वृत्तपत्र सुरू झाले. नव्वद वर्षांनंतर याच दिवशी डॉ. ना. भि. परूळेकर यांनी 'सकाळ' वृत्तपत्र हे सुरू केले.
१८४८ : महात्मा फुले यांनी पुणे येथे पहिली मुलींची शाळा सुरू केली.
१८६२ : इंडियन पीनल कोड अस्तित्वात आले.
१८८० : विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गो. ग. आगरकर आणि माधवराव नामजोशी यांनी पुणे येथे 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली.
१८८३ : पुणे येथे नूतन मराठी विद्यालयाची स्थापना
१८९९ : क्यूबामधील स्पेनची राजवट संपुष्टात आली.
१९०० : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मित्रमेळ्याची स्थापना केली.
१९०८ : 'संगीतसूर्य' केशवराव भोसले यांनी हुबळी येथे 'ललित कलादर्श' ही नाटक कंपनी स्वबळावर स्थापन केली.
१९१२ : याच दिवशी रिपब्लिक ऑफ चायना ची स्थापना झाली होती.
१९१५ : लामहात्मा गांधीयांना केसर ये हिंद चा पुरस्कार व्हायसरॉय यांच्या हातून मिळाला.
१९१९ : गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अ‍ॅक्ट अमलात आला व देशात कायदेमंडळे स्थापन झाली.
१९२० : शंकरराव वासुदेव किर्लोस्कर यांनी छापखान्याची स्थापना केली. त्यातुनच किर्लोस्कर, स्त्री व मनोहर या मासिकांचे संपादन सुरू केले. 'शंवाकिय' हे त्यांचे आत्मकथन हा उत्कृष्ट आत्मचरित्राचा नमुना आहे.
१९२३ : ला चित्तरंजन दास आणिजवाहरलाल नेहरूयांनी स्वराज पक्षाची स्थापना केली.
१९३२ : डॉ. ना. भि. परूळेकर यांनी 'सकाळ' वृत्तपत्र हे सुरू केले.
१९६४ : छत्रपती शिवाजी महाराजयांनी सुरत अभियानाला सुरुवात केली.
१९७२ : वाघाला राष्ट्रीय प्राणी म्हणून निवडल्या गेले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६२ : बाळाजी विश्वनाथ भट तथा पहिला पेशवा (मृत्यू: १२ एप्रिल १७२०)
१८७९ : इ. एम. फोर्स्टर ब्रिटिश साहित्यिक (मृत्यू: ७ जून १९७०)
१८९२ : महादेव देसाई स्वातंत्र्य लढ्यातील नेते आणि महात्मा गांधींचे स्वीय सहाय्यक (मृत्यू: १५ ऑगस्ट १९४२)
१८९४ : सत्येंद्रनाथ बोस भारतीय भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ४ फेब्रुवारी १९७४)
१९०० : श्रीकृष्ण नारायण रातंजनकर आग्रा घराण्याचे गायक, शास्त्रीय संगीताचे गाढे अभ्यासक व संगीत गुरू (मृत्यू: १४ फेब्रुवारी १९७४)
१९०२ : कमलाकांत वामन केळकर भारतातील भूविज्ञान अध्ययनाचा पाया घालणारे वैज्ञानिक (मृत्यू: ६ डिसेंबर १९७१)
१९१८ : शांताबाई दाणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायी (मृत्यू: ९ ऑगस्ट २००२)
१९२३ : उमा देवी खत्री उर्फ 'टुन टुन' अभिनेत्री व गायिका (मृत्यू: २४ नोव्हेंबर २००३)
१९२८ : डॉ. मधुकर आष्टीकर लेखक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष (मृत्यू: २२ मे १९९८)
१९३५ : ला भारतीय अभिनेत्री शकीला यांचा जन्म.
१९३६ : राजा राजवाडे साहित्यिक (मृत्यू: २१ जुलै १९९७)
१९४१ : गोवर्धन असरानी ऊर्फ 'असरानी' चित्रपट कलाकार
१९४३ : रघुनाथ माशेलकर शास्त्रज्ञ, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे महासंचालक, पद्मश्री, पद्मभूषण
१९५० : दीपा मेहता भारतीय वंशाच्या कॅनेडियन दिग्दर्शिका आणि पटकथालेखिका
१९५१ : नाना पाटेकर अभिनेता
१९५३ : भारताचे माजी विदेश मंत्री सलमान खुर्शीद यांचा जन्म.
१९६१ : मणिपूर चे माजी मुख्यमंत्री एन.बीरेन सिंह यांचा जन्म.
१९७१ : संसद चे माजी सदस्य ज्योतिरादित्य सिंधिया यांचा जन्म.
१९७५ : चित्रपट सृष्टीची अभिनेत्री सोनाली बेंद्रे यांचा जन्म.
१९७९ : चित्रपट सृष्टीची अभिनेत्री विद्या बालन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५१५ : लुई (बारावा) फ्रान्सचा राजा (जन्म: २७ जून १४६२)
१७४८ : योहान बर्नोली स्विस गणितज्ञ (जन्म: २७ जुलै १६६७)
१८९४ : हेन्रिच हर्ट्झ जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २२ फेब्रुवारी १८५७)
१९४४ : सर एडविन लुटेन्स दिल्लीचे नगररचनाकार (जन्म: २९ मार्च १८६९)
१९५५ : डॉ. शांतिस्वरुप भटनागर वैज्ञानिक (जन्म: २१ फेब्रुवारी १८९४)
१९७५ : शंकरराव वासुदेव किर्लोस्कर उद्योजक, साहित्यिक व चित्रकार. (जन्म: ८ आक्टोबर १८९१)
१९८३ : भारतातील प्रसिद्ध उद्योगपती डी.एन.खुरोदे यांचे निधन.
१९८९ : दिनकर साक्रीकर समाजवादी विचारवंत व पत्रकार
२००८ : ला भारताचे प्रसिद्ध लेखक प्रतापचंद्र चंदर यांचे निधन.
२००९ : रामाश्रेय झा संगीतकार, वादक व शास्त्रीय संगीतातील विद्वान (जन्म: ११ ऑगस्ट १९२८)

# अखेर पिंपरनई येथील गणेशनगर वस्तीवरील पाणंद रस्त्याचे काम सुरु







## ग्रामस्थांची चिखल तुडवीत होणारी पायपीट थांबणार

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपरनई ग्रामपंचायत अंतर्गत गणेशनगर वस्तीवरील ग्रामस्थांची पावसाळ्यात चिखलातून होणारी पायपीट, मुलांच्या शाळा, बाजारहाट,दवाखाना आदी कामांसाठी पावसाळ्यात चिखल तुडवीत होणारी ससेहोलपट ग्रामपंचायतीच्या १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन रस्तकाम सुरू केल्याने थांबणार आहे. बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून कामाची सुरुवात करण्यात आली.यावेळी पिंपरनई सरपंच रतन सोनावणे,उपसरपंच बाळासाहेब वायभट, ग्रामसेवक सय्यद,वायभट,लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, अंजनवतीचे बाळासाहेब मोरे पाटील, पांडुरंग वाणी, विक्रांत वाणी गणेशनगर वस्तीवरील रविंद्र वायभट, विकास वायभट, अशोक वायभट,सौरभ वायभट, लक्ष्मण वायभट,आश्रुबा वायभट,रामप्रभु वायभट, महादेव वायभट, माऊली वायभट, नवनाथ मानकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

बीड तालुक्यातील मौजे.पिंपरनई ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत गणेशनगर वस्ती २५ वर्षांपासून वास्तव्यास असुन २५-३० घरांचा उंबरठा असलेल्या जवळपास १५० लोकसंख्या असलेल्या वस्तीवरील ग्रामस्थांची रस्ता नसल्याने पावसाळ्यात शालेय मुलांची शाळा,दुधदुभते, भाजीपाला, बाजारहाट आदि कामांसाठी पावसाळ्यात गुडघाभर चिखल तुडवीत जावे लागत असे.

यारस्त्यासाठी गणेशनगर वस्तीवरील ग्रामपंचायत सदस्य कृष्णा वायभट यांनी शासनदरबारी पाठपुरावा केला.आणि अखेर सरपंच, उपसरपंच यांनी १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून रस्त्याचे काम सुरू केले आहे. ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्राम समृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आणली. मात्र शासकीय नियमांच्या कचाट्यात योजना सापडली असुन प्रसिद्धी माध्यमांद्वारे गाजावाजा करण्यात आलेल्या योजनेचे वास्तव क्लेशदायक आहे. शासकीय नियमांमुळे ग्रामस्थांना स्वखर्चाने रस्ते करण्याची वेळ आली आहे. बीड जिल्ह्यातील शासनाने मंजुरी दिलेल्या २०७४ कामांपैकी केवळ ४४८ कामेच म्हणजे २३ टक्केच कामे पूर्ण झाल्याने ग्रामीण भागात ही योजना मृगजळ ठरू पहात आहे.ग्रामीण भागातील शेतवस्त्यांवरील ग्रामस्थांना शाळा, दुधदुभते, भाजीपाला, बाजारहाट, शेतमाल वाहतुकीचा प्रश्न प्रलंबित आहे. दरवर्षी पेरणीसाठी बी बियाणे नेताना त्याचबरोबर पिक काढल्यानंतर शेतीमाल वाहतुकीसाठी रस्ता नसल्याने शेतकऱ्यांची अडचण होत असुन प्रलंबित पाणंद शेत रस्ता कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# एसडीएम व तहसीलदार यांची गोदापात्रात वाळू माफियावर कारवाई

अंबड। प्रतिनिधी

आज महसूल विभागाची दोन ठिकाणी विविध पथक मार्फत गोदापत्रात अवैध गौण खनिज करणारे वाहतूक वाहना विरुद्ध कार्यवाही उपविभागीय दंडाधिकारी पुलकित सिंग व तहसीलदार विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही तालुक्यातील संयुक्त पथकाने सकाळी रेती वाहतूक करणारे हायवा पकडून तहसील कार्यालयात लावण्यात आले नंतर तसेच गोदापात्रात जाऊन धडाकेबाज कारवाई केली. त्यानंतर गोंदी परिसरात दोन वेळ रेती उत्खनन करण्याकरता असलेले केणी सह ट्रॅक्टर पकडण्यात आले उपविभागीय अधिकारी यांनी स्वतः बोटीमध्ये प्रवास करून अंबड तालुका तसेच गेवराई तालुक्याच्या मध्ये असलेल्या नदीतील सर्व केली बांधण्याकरता वापरत असणाऱ्या दोरी कापून उध्वस्त केले .त्याचवेळी गोरी गांधारी



या ठिकाणी तहसीलदार विजय चव्हाण व त्यांच्या पथकातील सदस्यांनी मोजे गौरी गांधारी परिसरात असलेले केणी करता बांधण्यात आलेल्या दोऱ्या कापण्यात आल्या त्यापैकी काही दोऱ्या जप्त करून तहसील कार्यालयात जमा करण्यात आल्या त्याचबरोबर तेथील न उचलता येणाऱ्या दोऱ्या त्या ठिकाणी आग लावून भस्म करण्यात आले .सदर परिसरात शोध घेतला असता दोन केण्यास सापडून आल्या सदरील दोन केण्यात जप्त करण्यात आले आहे सदरील कार्यवाही उपविभागीय दंडाधिकारी व तहसीलदार श्री विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली सदर कार्यवाही मध्ये विविध मंडळ अधिकारी तलाठी तहसीलदार व नायब तहसीलदार समाविष्ट होते.

# पत्नीचा खून प्रकरणी पतीस जन्मठेपेची शिक्षा

परतुर । प्रतिनिधी

पत्नीचा खून प्रकरणी पती आरोपी मिलींद नारायण पाडेवार, वय २५ वर्ष रा. आंबेडकर नगर, परतुर ता. परतुर जि. जालना या आरोपीस पत्नीचा खून केल्या प्रकरणी कलम ३०२ भा.द.वी. मध्ये जन्मठेपेची शिक्षा व दहा हजार रूपये दंड व दंड न भरल्यास सहा महिने साधा कारावासाची शिक्षा ठोठावली.

घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक ३०/१०/२०२२ रोजी फिर्यादी हा सातोना (खु) ता. परतुर जि. जालना येथे भोरूभाई अन्सारी यांचे ट्रॅक्टरवर चालक म्हणुन कामास होतो. तेथे कामावर असतांना दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास लैला सय्यद हिने फिर्यादीस फोन करून सांगितले की, तुम्हारे भाडेकरूने उसके औरत का खुन कर दिया तुम जलदी आवो पुलीस आये वाले है असे सांगितले त्यानंतर फिर्यादीने त्याच्या पत्नीस घरी जावुन पाहणी करून खात्री करण्यास सांगितले असता त्याच्या पत्नीने सुध्दा किरायाने दिलेल्या घरी जावुन पाहणी करून फोनवर फिर्यादीला कळविले की, त्यांचे भाडेकरू असलेला मिलींद नारायण पाडेवार याने त्याचे पत्नीवर चारित्र्याच्या संशयावरून त्याची पत्नी प्रतिक्षा मिलींद पाडेवार हिस सकाळी ११.०० वाजताचे सुमारास कु-हाडीने डोक्यात तिक्ष्ण घाव करून निवे ठार मारून टाकले आहे असे कळविले म्हणून फिर्यादी हा तात्काळ मोटार सायकल वरून परतुर येथे येवुन पोलीस स्टेशनला गेला असता आरोपी मिलींद नारायण पाडेवार यास असे का केले असे विचारणा केली असता त्याने माझी बायको नेहमी फोनवर कोणाला तरी बोलते तिची चालचलन व वव्रवणुक चांगली नाही व मी तीला सकाळी तिला फोनवर कोणाला तरी बोलत असतांना पाहिले म्हणुन तिला घरातील कु-हाडीने पत्नीच्या डोक्यात सपासप घाव करून जिवे मारून खुन केला असे फिर्यादीला सांगितले. म्हणुन सदर फिर्यादीच्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन परतुर येथे गुन्हा कं. ५११/२०२२ कलम ३०२ भादंवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. तपासाअंती मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

सरकार पक्षातर्फे सदर प्रकरणात अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड भारत के. खांडेकर यांनी एकूण १६ साक्षीदार तपासले. त्यात फिर्यादी, पंच साक्षीदार, वैदयकीय अधिकारी व इतर साक्षीदार तसेच तपासीक अंमलदार श्री. एस. पी. पुंडगे, सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन परतुर यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या. तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी श्री.एम.टी. सुरवसे, पोलीस निरीक्षक पो.स्टे. परतुर यांनी वेळोवेळी सरकारी वकील व न्यायालयामध्ये मदत केल्यामुळे आरोपीस पत्नीचा खुन केल्या प्रकरणी कलम ३०२ भा.द.वी. मध्ये जन्मठेपेची शिक्षा व दहा हजार रूपये दंड व दंड न भरल्यास सहा महिने कारावासाची शिक्षा ठोठावली.

# जागतिक स्पर्धेतील साई पब्लिक स्कूलचे यश प्रेरणादायी - प्रा. सत्यप्रेम लगड

दिंद्रुड। प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शाळा सुद्धा वरचेवर अपडेट होत आहेत. 'हम भी किसी से कम नही' असे म्हणत खेड्यापाड्यातील शेतकरी व कष्टकऱ्यांची मुलं विवीध क्षेत्रात पुढं येत आहेत. शिक्षकांची कल्पकता व संस्थेची दुरदृष्टी यामुळे लोणगाव सारख्या छोट्या गावातील शाळा अल्पावधीतच नावारूपाला आली आहे. या शाळेतील विद्यार्थी जागतिक पातळीवरील स्पर्धेत 'सुवर्णपदक' मिळवतात ती अभिमानाची बाब असून इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध वात्रटीकाकार प्रा.सत्यप्रेम लगड यांनी केले.ऑलंपियाड स्पर्धेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी प्रा.लगड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.शिवाजीराव मुंडे होते.

तर विद्यार्थी व पालक यांना विशेष मार्गदर्शन करण्यासाठी सुप्रसिद्ध वात्रटीकाकार तथा विनोदी कवी प्रा.सत्यप्रेम लगड यांना निमंत्रित करण्यात आले होते.




प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच नारायणराव राऊत, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर, उपसरपंच बंडू चव्हाण, पत्रकार संतोष स्वामी, नितीन वाघमोडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. संस्थेचे संचालक सुनील मुंडे, कार्यवाह लक्ष्मीकांत सोळंके यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रास्ताविक प्राचार्य शरद चव्हाण यांनी केले. माजलगाव तालुक्यातील लोणगाव येथील साई पब्लिक स्कूल च्या दीडशे विद्यार्थ्यांनी सायन्स ओलंपियाड या परीक्षेसाठी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी ५५ विद्यार्थ्यांनी गणित आणि विज्ञान या विषयात सुवर्णपदक मिळवले. सर्व विद्यार्थ्यांसाठी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागात खरी गुणवंत हिऱ्यांची खान आहे. मात्र ते शोधून त्यांना पैलू पडण्याचे काम येथील गुरूजण करत आहेत हे प्रशंसनीय आहे. शिक्षण घेताना विद्यार्थ्यांच्या मनात विविध प्रश्न निर्माण झाले पाहिजेत, त्याचे उत्तर मिळवण्यासाठी त्यांनी ज्ञानाचा व गुरुजनांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहनही प्रा.सत्यप्रेम लगड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सौ. वर्षा गणेश सोळंके यांनी मानले.

# त्यागमूर्ती माता रमाई जयंतीनिमित्त सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन

माजलगाव। प्रतिनिधी

क्रांतीसुर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त होत असलेल्या सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेत चारशे विद्यार्थ्यांनी भाग घेतला आहे अशी माहिती संस्थेचे विश्वस्त सदानंद प्रधान यांनी दिली आहे परीक्षत सहभागी विद्यार्थ्यांना सावित्री माई चा ग्रंथ परीक्षा पॅड व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस सात ७००० दुसरे पारितोषिक ५००० तिसरे पारितोषिक ३००० रु. हे देणार आहेत प्रोत्साहन प्रति ५०० रु प्रमाणे १० बक्षीसे देण्यात येणार आहेत विशेष सहकार्य सहकार्य , प्राचार्य मा. सानप साहेव, मा.प्रा. संजय बागुल सर , मा.के.व्ही. साळवे, मा. अभिमन्यु इबीते सर, मा. राहुल टाकणखार सर, मा. चंद्रशेखर तौर, मा. रमेश वजीर, मा. नामदेव भगत, मा. वसंत टाकणखार, मा. कपिल डोंगरे, मा. लक्ष्मण पोटभरे, मा. प्रभाकर साळवे, मा. कैलास टाकणखार, मा.प्रा.डॉ.एम.एस. वानखेडे, मा.प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा.व्हि.एस. भिसे मॅडम, मा. प्रमोद साळवे, मा.वाय.बी.भोसले, मा.प्रा. राहुल कांबळे, मा. प्रशांत जाधव, मा. बळीराम कोरडे, मा. एकनाथ मस्के, मा. बाबासाहेब जाधव, मा.प्रा. धम्मानंद बोराडे, मा. संघर्षकुमार डोंगरे, मा. शांतीलाल पट्टेकर, मा. शिवाजी ससाणे, मा. संदीप वाघमारे, मा. सचिन कांबळे, मा. राजकुमार सोनपसारे, मा. अरविंद ओव्हाळ, मा. अमर साळवे, मा. समाधान आवेगावकर, मा. किसन भदर्गे, मा. नितीन गायसमुद्रे यांचे असुर आयोजन अशोक मगर, शत्रुघ्न कसबे, अश्विन टाकणखार, संदेश डोंगरे, दिनेश निसर्गंध, प्रविण ओव्हाळ, स्वप्नील स्वामी, संकेत लांडगे, सदानंदभैय्या प्रधान, आजिनाथ लोखंडे, केतन प्रधान, राज सोनवणे, संजोग कसबे, राहुल वाघमारे, डॉ. सुहास टाकणखार, दिपक टाकणखार, अभिजीत साळवे, संदेश निसर्गंध, सचिनदादा टाकणखार, संदेश लांडगे, रविकिरण टाकणखार, नवनाथ तोडके, नितीन मगर, विशाल टाकणखार, विजय साळवे, सचिन मगर, विलेश कांबळे, बळीराम माने, मुंजाजी तुपसमुद्रे, राज कुमावत, नंदकिशोर निसर्गध, रोहन टाकणखार, गब्बर ससाणे, सुहास टाकणखार, आरव जोगदंड, कपिल भाग्यवंत, ऋषीकेश सोनवणे, विशाल सोनपसारे, सुजल खळगे, दिपकदादा गायकवाड, सुबोध खळगे, रविराज भालेराव, प्रमोद भदर्गे, मिलिंद भाग्यवंत, बळीराम जाधव, सिद्धार्थ साळवे, राहुल धाईजे, मानव पोटभरे, शशिकांत घनघाव, अनिल भराटे, उत्कर्ष शिंदे, नवरत्न प्रधान, अविनाश गायकवाड, सचिन सिरसट, संघपाल साळवे, रमेश बल्लाळ, सुशिम बोराडे, बबलु फंदे, उत्कर्ष शिंदे यांनी केले आहे

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे- काका कोयटे

## ग्राहक मेळावा व आर्थिक साक्षरता अभियानास ग्राहकांचा प्रतिसाद

माजलगाव। प्रतिनिधी

येथील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट च्या परळी शाखेचा ग्राहक मेळावा व आर्थिक साक्षरता कार्यक्रम दि २९ डिसेंबर रोजी संपन्न झाला.श्रीमंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेला २५ वर्ष पूर्ण होत असून त्यानुषंगाने संस्थेच्या रोप्यमहोत्सव व परळी शाखेच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त परळी शाखेचा ग्राहक मेळावा आयोजित करण्यात आला होता.ग्राहक मेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशन चे अध्यक्ष श्री काकासाहेब कोयटे तर प्रमुख अतिथी म्हणून माजलगाव मिस्कीन स्वामी मठ संस्थानचे मठाधिपती श्री चंद्रशेखर शिवाचार्य महाराज माजलगावकर हे होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री आर.जी. कानडे तर प्रमुख पाहुणे म्हणून सोमनाथ अप्पा हालगे माजी नगराध्यक्ष परळी अशोकशेठ जैन माजी चेअरमन वैद्यनाथ बँक परळी,दत्ता अप्पा इटके, सचिव जवाहर एजुकेशन सोसायटी,विष्णुपंत कुलकर्णी संचालक भा .शि. प्र.म. अंबेजोगाई,चेतन सौंदळे माजी नगरसेवक परळी व श्री रमेश सपाटे संचालक श्री मंगलनाथ मल्टीस्टेट इत्यादी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे उदघाटक श्री काकासाहेब




कोयटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, श्री मंगलनाथ समूह हा गेली २५ वर्षांपासून सहकार क्षेत्रात यशस्वी कार्य करत आहे.

बीड जिल्ह्यातील सहकारक्षेत्राचा पाया श्री मंगलनाथ मल्टीस्टेट संस्थेने उभारला असुन संस्थेचे अध्यक्ष हे निवृत्त लेखापरीक्षक असल्यामुळे त्यांनी संस्थेचे आर्थिक धोके लक्षात घेऊन कामकाज पहिले त्यामुळे संस्था गेली २५ वर्षांपासून अविरत आपल्या सेवेत भक्कम उभी आहे.सोनेतारण कर्ज सारख्या सुरक्षित कर्जा ला प्राधान्य देत ठेवीदारांना भक्कम सुरक्षा कवच निर्माण करण्याचे कार्य संस्थेने केले आहे.मंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेचे सहकार चळवळीत महत्वपूर्ण योगदान राहिले असून आर्थिक साक्षरता अभियान राबवत ग्राहकांमध्ये जनजागृती करणारी मंगलनाथ ही पहिली संस्था आहे असे गौरव उद्गार त्यांनी काढले,यापुढे देखील संस्था सभासदांच्या गरज जाणून कार्य करत राहील व सहकारातून समृद्धीकडे वाटचाल करत सर्व सहकारी पतसंस्थांसाठी दीपस्तंभा प्रमाणे कार्य करत राहील असा विश्वास व्यक्त करत संस्थेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष आर.जी.कानडे यांनी अध्यक्षीय समारोप केला व सांगितले कि संस्थेला २५ वर्ष पूर्ण होत आहेत या २५ वर्षातील एकंदरीत गुणवत्ता पूर्वक प्रगतीमध्ये सभासद वर्गाचे मोलाचे सहकार्य सभासदांचे लाभले त्यामुळे सभासदांचे आभार व्यक्त करतो व येत्या काळामध्ये संस्था सभासदांकरिता अनेक उपयोगी योजना राबवणार असून संस्था

या पुढे देखील सभासदांचे हित जोपासून कार्य करेल असे आश्वासन दिले.कार्यक्रमास परळी परिसरातील मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री रवींद्र कानडे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शाखेचे व्यवस्थापक गजानन हालगे उमाकांत काळे,श्री मुळे आनंद श्री सर्वेश सपाटे यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयातर्फे

# वृद्धाश्रमात फळे वाटप



पाटोदा। प्रतिनिधी

येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त २८ डिसेंबर रोजी मोरदरा स्थित कामधेनू आरोग्यधाम वृद्धाश्रमात फळे वाटप करण्यात आली.

प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या समाजोत्पादक कक्षाच्या माध्यमातून हा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे, प्रसिद्धी विभागप्रमुख डॉ. मनोजकुमार प्रकाश, समाजोत्पादक कक्षाचे समन्वयक प्रोफेसर हमराज उईके, कर्मचारी कल्याण समिती सचिव डॉ. शरद पवार उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य हांगे व उपस्थितांनी वृद्धाश्रमातील वृद्ध नागरिकांची आस्थेवाईकपणे माहिती घेतली तसेच कामधेनू गोशाळेचेही अवलोकन केले.

राज्य लोकतंत्र

बुधवार, दि. १ जानेवारी २०२५ | ६

# विनायकराव मेटेंची व्यसमुक्तीची चळवळ निर्धाराने पुढे नेणार -डॉ.ज्योतीताई मेटे

## बीडमधून निघाली भव्य व्यसनमुक्ती जनजागृती फेरी *जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी व्यसनमुक्ती रॅलीला दाखवला हिरवा झेंडा

बीड । प्रतिनिधी

**लोकनेते विनायकराव मेटे यांनी उभ्या हयातीत सामजिक प्रश्नावर लढा दिला. समाज व्यसनमुक्त व्हावा यासाठी नेहमीच त्यांचा प्रयत्न राहिला त्यांच्या दुर्दैवी जाण्याने त्यांची ही चळवळ आता शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे या पुढे घेऊन जात आहेत. प्रति वर्षी प्रमाणे यंदाही तुकाराम रूरल अँड ह्युमन डेव्हलपमेंट चॅरिटेबल ट्रस्ट, बीड च्या माध्यमातून व्यसनमुक्ती अभियान राबविण्यात येत असून आज दि. ३१ डिसेंबर रोजी शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली. येथील श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रिडा संकुल येथून डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या जनजागृती रॅलीला हिरव झेंडा दाखवत सुरुवात केली.**

श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रिडा संकुल येथून निघालेली फेरी सुभाष रोड, माळीवेस, धोंडीपुरा, बलभीम चौक, बशीरगंज, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात पोचली. 'मद्यपान संसाराची धुळधाण', 'व्यसनाची गोडी अन्? संसाराची राखरांगोळी', 'घ्याल तंबाखुची साथ', 'आयुष्य होईल बरबाद', अशा विविध घोषणांनी परिसर दणानूण गेला. वारकरी मंडळी हे या रॅलीतील मुख्य आकर्षण ठरले त्याचबरोबर परिचर्या महाविद्यालये, शाळा, महाविद्यालयातील हजारो विद्यार्थी, तरुण, समाजातील विविध घटकांतील नागरिकांसह महिलांनीही मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. सहभागींच्या हाती घोषणांचे फलक होते. यावेळी तंबाखू जन्य पदार्थांची होळी देखील करण्यात आली आणि जनजागृती रॅलीचा समारोप हा व्यसनमुक्तीची शपथ देऊन करण्यात आला.





### घोषणांनी दणाणून गेले बीड शहर

### घोषणा फलक हाती घेऊन विद्यार्थ्यांचा सहभाग

### तंबाखूजन्य पदार्थांची केली होळी

यावेळी शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, सुशिलाताई मोराळे,शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशिद, नितीन शेठ कोटचा ,भाजपा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ, अशुतोश मेटे, नितीन लाठकर, अनिल घुमरे पाटील, सुहास पाटील, उत्तमराव पवार ,नारायण थोरात, गौतम खटोड,ए. आर. पाटील, गोपाळ धांडे, सुभाष जाधव, बन्सी हावळे सर, बाळासाहेब हावळे, पंडित माने, गोपीनाथ घुमरे , सचिन कळकुटे, नवनाथ प्रभाळे आदींसह प्रतिष्ठानचे , शिवसंग्रामचे शेकडो कार्यकर्ते यांच्यासह विद्यार्थी, तरुण , नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.जगातील सर्वाधिक तरुणांचा देश म्हणून भारत पुढे येतो आहे. त्याचबरोबर आर्थिक दृष्ट्या संपन्न आणि अनेक बाबतीत महाराष्ट्राची ख्याती आहे. असे असताना देखील २०१९ ते २१ या कालावधीमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यांचा विचार करता देशात सर्वप्रथम उत्तर प्रदेश त्यानंतर पंजाब आणि महाराष्ट्राचा नंबर लागतो हे राज्यसभेमध्ये पटलावर ठेवलेल्या माहितीवरून दिसून येते हे गुन्हेगारीचे वाढते प्रमाण फक्त व्यसनामुळेच होत आहे. ही बाब संस्कृत महाराष्ट्रला वेदना देणारी आहे. याची जाणीव ठेवत लोकनेते विनायकराव मेटे यांनी ही व्यसनमुक्तीची चळवळ उभी केली ती चळवळ आम्ही निर्धाराने पुढे नेत आहोत असे प्रतिपादन डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी व्यसनमुक्ती जनजागृती रॅलीच्या समारोपाप्रसंगी व्यक्त केले. तसेच कार्यक्रमात सुशिलाताई मोराळे, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव, भाजपा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ, अशुतोश मेटे, शिवसंग्राम जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.

# मस्तगड परिसरातून ऑटोरिक्षा चोरीस

जालना । प्रतिनिधी

शहरातील मस्तगड परिसरात असलेल्या मम्मादेवी मंदिराजवळून नवीन ऑटो रिक्षा चोरीस गेल्याची घटना घडली आहे.

रिक्षा चालक शेख सिद्दिक शेख करीम यांनी कदीम जालना पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हंटले आहे की,त्यांच्या मालकीची नवीन बजाज ऑटो रिक्षा (रू.९०,००० ) क्रं.एम.एच.२१ बी. जी. १३८४ ही दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी मम्मादेवी मंदिराच्या पाठीमागील बाजूस लोखंडी पूलाकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभी केली होती. दुसऱ्या दिवशीही रिक्षा जागेवरच उभी होती नातेवाईकांसोबत त्यांनी रिक्षाचा शोध घेतला असता रिक्षा मिळाली नाही. याप्रकरणी चालक शेख सिद्दिक शेख करीम यांच्या फिर्यादी वरून कदीम जालना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.



बीड – जिल्ह्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे दर्शवेळा सोमवती अमावस्या निमित्त विसाव्या शतकातील महान तपस्वी संत श्री वै.ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या दर्शनासाठी हजारो भाविकांनी लांबच लांब रांगा करुन मोठी गर्दी केली होती. दरम्यान माऊली दादांच्या मंदिर परिसरात घेतलेले छायाचित्र (छाया– विनोद पौळ,गेवराई)

# येत्या प्रजासत्ताकदिनी बीडपर्यंत रेल्वे धावणार –खा. बजरंग सोनवणे

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये रेल्वे अधिकाऱ्यांची नुकतीच बैठक घेतली असून संपूर्ण माहिती घेतल्यानंतर येत्या प्रजासत्ताक दिनी म्हणजे २६ जानेवारी२०२५ पर्यंत नगर–बीड पर्यंत रेल्वे धावणार असल्याची माहिती खासदार बजरंग सोनवणे यांनी पत्रकार परिषद बोलताना दिली.

यावेळी बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले की बीड पर्यंत रेल्वे रुळाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. काही ठिकाणी पुलाचे काम बाकी आहे .मात्र तेही लवकरच पूर्ण होईल. आणि बीड पर्यंत रेल्वे महिन्याभरात धावेल असे बजरंग सोनवणे यांनी सांगितले. राष्ट्रीय महामार्गाबाबत बोलताना ते म्हणाले की बीड मधील खामगाव– पंढरपूर हा पालखी मार्ग तसेच पैठण– पंढरपूर या पालखी मार्गाचे काम काही ठिकाणी रखडले आहे. हे काम लवकरच पूर्ण होऊन हा रस्ता सुरू होईल. याशिवाय धुळे – – –सोलापूर हायवे पासूनचा बीडमध्ये येणारा रस्ता हा चौपदरी करण्यासाठी प्रस्ताव दिलेला आहे. हा प्रस्ताव मंजूर होऊन हे काम लवकरच पूर्ण होईल. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बार्शी ◀◀ पान ३ वर



# यशवंत शेरे यास राष्ट्रीय स्तरावरील प्रथम पारितोषिक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बनेश्वर शिक्षण संस्था संचलित गुरुदेव विद्यालय मोरेवाडी येथील इयत्ता नववीचा विद्यार्थी यशवंत नामदेव शेरे याने राष्ट्रीय स्तरावरील ऑफलाइन अबॅकस स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक प्राप्त केल्या असून लेवल वन बी त्याने यशस्वीरित्या पार केलेली आहे. अबॅकसचे त्याचे प्रशिक्षक महेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंतने जी चॅम्प म्हणून राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिक मिळवून गुरुदेव विद्यालयाचे व सर्व मार्गदर्शक शिक्षक वृंदाचे नाव रोशन केले आहे. जेनियन एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड यांच्यावतीने लातूर येथे नॅशनल लेवल ऑफलाइन अबॅकस कॉम्पिटिशन ◀◀ पान ३ वर




# मच्छिंद्रनाथांच्या समाधी मंदिराची पुनर्बांधणी होणार -आ. सुरेश धस

### मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रारंभ करू

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

धार्मिक निसर्ग व देवभूमी पर्यटन श्री क्षेत्र म्हणून मायंबा देवस्थानचा विकास सुरू आहे व मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते नाथवंतांचे अध्यनाथ बडे बाबा मच्छिंद्रनाथाचे मुख्य समाधी मंदिराच्या पुनर्बांधणीच्या कामाचा प्रारंभ करण्याचा निर्णय विश्वस्त मंडळांनी घेतल्याची माहिती मायंबा देवस्थानचे पदसिद्ध विश्वस्त आमदार सुरेश धस यांनी दिली मायंबा देवस्थान येथे विधानसभा निकाल नंतर आमदार धस यांनी सहकुटुंबनाथाच्या पादुकाची महापूजा व संजीवन समाधीचे दर्शन घेतले यावेळी देवस्थान समितीचे अध्यक्ष दादासाहेब चितळे, सचिव बाबासाहेब मस्के, कोषाध्यक्ष अध्यक्ष रमेश ताठे, बीड सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कृष्णांत पान संबळ ,उप अभियंता एम एस निंबाळकर ,यांच्यासह प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे वरिष्ठ अधिकारी व सर्व विश्वस्त उपस्थित होते विधानसभा निवडणुकीत आमदार धस मोठ्या मताधिक्याने निवडून आल्याबद्दल विविध कार्यकर्ते व भाविकांनी केलेल्या नवसाची पूर्तता करण्यात आली. विविध कामात अडथळे ठरणारे व हरकतीचे मुद्दे सामूहिक चर्चेतून निघाले ◀◀ पान ३ वर



### त्यांना नाथांनी अद्दल घडवली

**माझ्या पराभवासाठी अनेक कट कारस्थाने रचली गेली मच्छिंद्रनाथाचे आशीर्वादाने अनेकांचे मनसुबे धुळीस मिळाले माझ्यावर गैरव्यवहाराचा आरोप करणाऱ्यांना नाथांनी अद्दल घडवली राजकारणाचा आखाडा देवस्थान करू नका कोणी गैरव्यवहार येथे केला तर त्याची खैर देवाच्या दरबारात राहणार नाही असे म्हणत त्यांनी सध्या राजकीय परिस्थितीवर आमदार धस यांनी बोलणे टाळले.**

# मंत्री पंकजाताई आणि डॉ. प्रितमताईंनी जिल्ह्यात पारदर्शी, स्वच्छ कारभार करून विकासकामे करून दाखविली – सलीम जहाँगीर

## बीडची रेल्वे केवळ मुंडे भगिनींनीच आणली, कोणीही अर्ध्या हळकुंडात पिवळे होऊ नये

बीड । प्रतिनिधी

विकास काय असतो हे पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे आणि बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी अख्ख्या जिल्ह्याला दाखवून दिले आहे. गेल्या काही वर्षात अगदी स्वच्छ प्रतिमा, पारदर्शी कारभार आणि विकासाचे व्हिजन समोर ठेवून मुंडे भगिनींनी बीड जिल्ह्याची सेवा केलेली आहे. निस्वार्थ भावनेने केलेल्या जनसेवेचे फलित आणि जिल्हावासियांच्या आशीर्वादामुळेच पंकजाताई राज्याच्या कॅबिनेट मंत्री पदी विराजमान झाल्या आहेत. पंकजाताई आणि जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी गेल्या दहा वर्षात केलेला पाठपुरावा आणि देशाचे पंतप्रधान नरेंदभाई मोदी यांनी दिलेल्या निधीमुळेच आज बीड जिल्हा वासियांचे रेल्वेचे स्वप्न प्रत्यक्षात पूर्ण होत आहे. रेल्वेचे श्रेय हे मोदी सरकार आणि मुंडे भगिनींचेच आहे, त्यामुळे कोणीही अर्ध्या हळकुंडात पिवळे होत त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये असे भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे महामंत्री सलीम जहाँगीर यांनी म्हटले आहे.

बीड जिल्ह्यात गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी , केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून पंकजाताई आणि प्रीतमताई मुंडे यांनी दूरदृष्टी ठेवून विकास केला. जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग या महत्वाच्या कामाबरोबरच बीड शहरातील नगर रोड ते तेलगाव रोडचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. ◀◀ पान ३ वर





# पुरस्कार मिळाल्याबद्दल तलाठी रामेश्वर थापडेंकडून पसायदानमध्ये अन्नदान

बीड । प्रतिनिधी

माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने माजलगाव भूषण पुरस्कार तलाठी रामेश्वर थापडे यांना मिळाल्याबद्दल ढेकनमोहा येथील पसायदान सेवा प्रकल्पाच्या मुलांना अन्नदान करण्यात आले. यावेळी दैनिक लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे, पसायदान सेवा प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे व इतर मान्यवरांच्या हस्ते श्री थापडे यांचा सत्कार करण्यात आला.

तलाठी रामेश्वर थापडे यांची ढेकणमोहाही जन्मभूमी आहे. माजलगाव तालुक्यामध्ये ते कार्यरत आहेत. तलाठी म्हणून रुजू झाल्यापासून त्यांनी उत्कृष्ट असे कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल माजलगाव येथील एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतीराम पांढरपोटे व त्यांच्या टीमने घेतली. तलाठी रामेश्वर थापडे यांना माजलगाव भूषण हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंदोत्सव साजरा करण्यात या हेतूने श्री थापडे यांनी पसायदान सेवा प्रकल्पाच्या मुलांसाठी अन्नदान केले. ◀◀ पान ३ वर




# फुले मार्केट उभारणीचे आश्वासन पूर्ण करा – हस्तीमल बंब

जालना । प्रतिनिधी

जनरल मर्चन्टस्? असोसिएशन जिल्हा जालना ची वार्षिक सभा जिल्हाध्यक्ष हस्तीमल बंब यांच्या अध्यक्षतेखाली सभागृहात खेळी–मेळीच्या वातावरणात अति उत्साहात पार पडली. प्रारंभी सचिव संदीप काबरा यांनी मागील बैठकीचे वृतांत सादर करून आजच्या बैठकीचे उद्देश्य सांगितले. कोषाध्यक्ष सुदर्शन चिप्पा यानी आवक – जावक हिसोब सादर केला. स्वागत प्रास्ताविक करताना श्री बंब यांनी सर्वाचे शब्द सुमनाने स्वागत करून आपली व्यापारी संघटना फार जुनी संस्था आहे. संघटनेला ५० वर्ष पूर्ण झाल्यामुळे सुवर्ण महोत्सव समारोह सुध्दा घेण्यात आले होते. मेडीकल संघटने नंतर आपली एकमेव संघटना आहे ज्याची जिल्ह्याच्या सर्व तालुक्यात, ग्रामीण भागात शाखा कार्यरत आहे. आपली संस्था धर्मादाय आयुक्त कडे नोंदणीकृत आहे. म्हणजे आपल्याला शासकीय मान्यात प्राप्त आहे. शासनाला कर देण्यास आपला जिला आघाडीवर आहे. जालना जिल्ह्याची ओळख व्यापारी वर्गामुळेच आहे, देशाच्या जडण–घडणीत व विकासासाठी उद्योजक, व्यापार्यांचा मोठा योगदान आहे. गल्ली ते दिल्ली पर्यंत दिशा बदलण्याची क्षमता व्यापारी वर्गात आहे. किचकट जी.एस.टी. कायदा सरळ व सोपे होणे आवश्यक आहे. शिक्षक मतदार संघ प्रमाणे व्यापारी मतदार संघ सुध्दा झाले पाहिजे. शहराच्या मध्यभागी बाजार पेठेत महात्मा फुले मार्केट उभारणीचा प्रश्न मागील अनेक वर्षापासुन प्रलंबित आहे. या निवडणुकापुर्वी शासना तर्फे मुख्यमंत्री यांनी, लोक प्रतिनिधीनी फुले मार्केट उभारणीचे आश्वासन दिले होते. दिलेले आश्वासन लवकरात लवकर पुर्ण करावे, नसता ◀◀ पान ३ वर




# सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त ३ जानेवारी रोजी विविध उपक्रमांचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी येथील महात्मा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांच्या वतीने अंबाजोगाईत ३ जानेवारी २०२५ रोजी ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या निमित्त आयोजित बैठकीत अभिवादन, अभिवादन रॅली, आदर्श माता पुरस्कार, गुणवंतांचा गुणगौरव आणि प्रबोधनपर व्याख्यान आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात करण्यासंदर्भात सर्वानुमते ठरले.

जयंती उत्सव आयोजनासाठी नितीन रामराव जिरे यांच्या निवासस्थानी आयोजित बैठकीत अंबाजोगाईत ◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मुख्यमंत्री झाल्यावर फडणवीसांचा ठाकरेंना पहिला धक्का, पुण्यातील माजी नगरसेवक करणार भाजपात प्रवेश

**पुणे । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीमध्ये दारुण पराभवाला सामोरे जावे लागल्यानंतर उद्धव ठाकरेंना भारतीय जनता पक्ष अजून एक मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहे. यावेळी काही माजी नगरसेवक उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करत भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करणार आहेत.

आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या तोंडावर भारतीय जनता पक्ष उद्धव ठाकरेंना मोठा राजकीय धक्का देणार आहे. पुण्यातील सहा माजी नगरसेवकांचा लवकरच भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश होणार आहे. येणारं वर्ष महानगरपालिकांचं वर्ष असणार असल्याचं म्हटलं जात आहे. अशावेळी सर्वच राजकीय पक्ष या निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत . अशातच भाजपा उद्धव ठाकरे यांना पहिला धक्का देणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ५ तारखेला मुंबईमध्ये पुण्यातील उद्धव ठाकरेंचे पाच माजी नगरसेवक हे भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करणार आहेत. स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये हा पक्षप्रवेश होणार आहे. बाळा ओसवाल, विशाल धनवडे यांच्यासह इतर नगरसेवक भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करणार आहेत.



विधानसभा निवडणुकीमध्ये ज्या प्रकारे महाराष्ट्रातील मतदारांनी भारतीय जनता पक्ष व महायुतीला मतदान केलं त्यावरूनच आगामी काळातला स्वतःच राजकीय भविष्य स्थिर करण्यासाठी भारतीय जनता पक्षामध्ये येणाऱ्या नगरसेवकांची संख्या ही नक्कीच जास्त असणार आहे. यातच पुण्यामधील पाच माजी नगरसेवकांनी ठाकरेंना जय महाराष्ट्र केल असून पाच तारखेला ते भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करणार आहेत. पुणे जिल्ह्यामध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला विधानसभा निवडणुकीमध्ये मोठा धक्का बसला. अशावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही उद्धव ठाकरे यांना भारतीय जनता पक्ष मोठा धक्का द्यायच्या तयारीत आहे. याची सुरुवात या पक्षप्रवेशामुळे होणार असल्याचे म्हटले जात आहे. लवकरच जिल्ह्यात अजूनही लोक पक्ष सोडू शकतात अशी चर्चा आहे.

कधी होणार प्रवेश?

नवीन वर्षात म्हणजेच जानेवारी ५ २०२५ या दिवशी या सर्व नगरसेवकांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईमध्ये पक्षप्रवेश होणार आहे. हा पक्षप्रवेश भारतीय जनता पक्षासाठी नवीन वर्षात बुस्टर डोस ठरणार आहे तर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसाठी मोठा धक्का मानला जात आहे

# सीआयडी कार्यालयासमोर मराठा समाजाचे आंदोलन, हत्या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार शोधण्याची केली मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील सीआयडी कार्यालयात दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड सीआयडीला शरण आला. यानंतर राज्यात ही बातामी वाऱ्यासारखी पसरली. सीआयडीला शरण जाण्यापूर्वी कराडने एक व्हिडिओ शेअर केला होता. या व्हिडिओत त्याने सीआयडीला सरेंडर जाणार असल्याचे म्हटले होते. हा व्हिडिओ प्रसारित झाल्यानंतर कराडने सीआयडीकडे आत्मसर्मण केले. एका पाढंऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओमधून कराड सीआयडी कार्यालयात हजर झाला होता. त्याअगोदर या ठिकाणी त्याचे समर्थकही दाखल झाले होते. दरम्यान, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार शोधून आरोपीला फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.



सीआयडी कार्यालयासमोर मराठा समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात आले आहे. यामुळे कोणताही अनुचित घटना घडू नये यासाठी सीआयडी कार्यालयासमोर पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वाल्मिक कराडची तीन तासांहून अधिक वेळ चौकशी केली जात आहे.

आंदोलनकर्त्यांची मागणी

आता या आरोपीला पोलिसांनी व्हीआयपी ट्रीटमेंट देऊ नये आणि या हत्येमागील मुख्य सूत्रधार शोधावा, असे प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनाकडून करण्यात येत आहे. आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तर कराड यांच्या समर्थकांनी आगामी निवडणुका लक्षात घेता त्यांना बीड हत्या प्रकरणात अडकल्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तसेच त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही. त्यांना सोडण्यात यावे, असे देखील कराड समर्थकांकडून सांगण्यात येत आहे.

# बारामतीत २७ बुलेटसह २३४ वाहनांवर कारवाई

**बारामती । प्रतिनिधी**

वाहतूक नियमांची पायमल्ली करून बेशिस्तपणे दुचाकी चालविणार्या टुकार वाहनचालकांना बारामतीच्या वाहतूक शाखेने चांगलाच दणका दिला आहे. पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्याकडून वाहतूक पोलिसांसोबत दोन दिवस करण्यात आलेल्या कारवाईत एकूण २३४ कारवाया करून या दुचाकीचालकांना तब्बल १ लाख ८५ हजार २५० रुपयांचा आर्थिक दंड करण्यात आला आहे.

दि. २७ ते २९ डिसेंबर या तीन दिवसांच्या कालावधीत वाहतूक शाखेकडून दुचाकीचालकांकडून ट्रिपल सीट दुचाकी चालविणे, वाहन परवाना जवळ न बाळगणे, दुचाक्यांना अवाढव्य आवाजाचे सायलेन्सर बसविणे, दुचाकी



चालवताना मोबाईलवर बोलणे, अशा अनेक कारणांवरून कारवाया करण्यात आल्या. विशेष म्हणजे, यात बुलेट गाड्यांवर अधिक लक्ष केंद्रित करून कारवाईची मोहीम राबविण्यात आली. बारामती येथील कसबा चौक व न्यायालय कॉर्नर चौक, फलटण चौक व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय येथे ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ट्रिपल सीट २५, वाहनचालक परवाना जवळ न बाळगणे ५५, नंबर प्लेटसंदर्भात ५६, विनापरवाना वाहन चालविणे ४, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे ६, बुलेटचे मूळ सायलेन्सर बदलणे २७ व इतर ५० अशा एकूण २३४ प्रकरणांमधून तब्बल १ लाख ८५ हजार २५० रुपये दंड करण्यात आला आहे. वाहतूक पोलिसांनी याअगोदरही मोठ्या दंडात्मक कारवाया करून वाहतूकव्यवस्था व नियमांची अंमलबजावणी करण्यात आली होती. ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनखाली बारामती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, सहायक फौजदार अशोक झगडे, सुभाष काळे, पोलीस हवालदार प्रदीप काळे, महिला पोलीस हवालदार स्वाती काजळे, रूपाली जमदाडे, माया निगडे, रेश्मा काळे, सीमा घुले, पोलीस जवान अजिंक्य कदम व आरसीपी पथकाचे पोलीस अंमलदार आदींनी केली

# ओतूर येथे सर्पदंश झालेल्या चिमुकल्याला मिळाले जीवदान

**ओतूर । प्रतिनिधी**

ओतूर (ता. जुन्नर) येथील सहावर्षीय चिमुकल्याला नाताळाच्या दिवशी (ता. २५) दुपारी अतिविषारी नागाने दंश केला. मात्र, योग्य सल्ला व तत्पर उपचार मिळाल्यामुळे १२ तास बेशुद्ध राहूनही त्याला जीवदान मिळाले आहे. देव तारी त्याला कोण मारी. ओतूर येथील अनिरुद्ध मुकेश विश्वकर्मा याला बुधवारी (ता. २५) खेळत असताना नागाने दंश केला. जवळच काम करत असलेल्या वडिलांनी ते पाहिले आणि परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी त्वरित अनिरुद्धला ओतूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. सुशील बागूल यांच्याकडे नेले. तेथे जाईपर्यंत अनिरुद्धला तीव्र वेदना व उलट्या होत होत्या.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून डॉ. बागूल यांनी डॉ. सदानंद राऊत यांना रुग्णाच्या लक्षणांची कल्पना दिली. त्यांच्या सल्ल्याने अनिरुद्धला प्रथम ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले. ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. श्रीहरी सरोक्ते यांनी त्याच्यावर प्रथमोपचार करून १०८ रुग्णवाहिकेच्या मदतीने नारायणगाव येथे पाठविले.

यावेळी चालक गणेश गायकर यांनी अवघ्या १६ मिनिटांत रुग्णवाहिका नारायणगाव येथे पोहोचवली. सर्पदंश झाल्यानंतर अवघ्या ४५ मिनिटांत रुग्ण विघ्नहर नर्सिंग होम येथे पोहोचला. तरीसुद्धा रुग्णाचे हृदय व श्वास बंद पडलेला होता. येथील डॉ. पल्लवी राऊत, डॉ. सदानंद राऊत व डॉ. साहिल शेख यांनी क्षणाचाही विलंब न करता



रुग्णाला छातीवर मसाज देत श्वसनलिकेत नळी टाकून कृत्रिम श्वासोच्छ्वास सुरू केला. त्याबरोबरच इतर तातडीचे वैद्यकीय उपचार इंजेक्शन अॅट्रोपिन, निओस्टिग्माइन, अॅड्रीनालीन व इतर जीवनावश्यक औषध देण्यात आली. त्याबरोबरच सर्पदंशावरील लसीचे २० वायल्स काही मिनिटांत देण्यात आले. एक तासाच्या अथक प्रयत्नानंतर अनिरुद्धचे हृदय उपचाराला प्रतिसाद देऊ लागले. रक्तदाब वाढू लागला. १२ तासांपेक्षा अधिक काळ बाळ पूर्णपणे बेशुद्ध होते. ते हळूहळू शुद्धीवर आले. त्यानंतर २४ तासानंतर बाळाला पुन्हा श्वास घेण्यास त्रास होऊ लागला व नाडीची गती वाढू लागली. पुन्हा विषाची लक्षणे दिसू लागल्यामुळे त्याला परत सर्पदंशाची लस देण्यात आली. दोन दिवसानंतर तो पूर्णपणे शुद्धीवर आला असून, त्याच्या जिवाचा धोका टळला आहे. दंशाच्या ठिकाणी खूप सूज आली असून, गँगरीन झाले आहे. त्याचा पाय वाचविण्यासाठी शस्त्रक्रिया करणार आहे. आमदार शरद सोनावणे यांनी हॉस्पिटलला भेट देऊन रुग्णाची चौकशी करून डॉ. सदानंद राऊत व डॉ. पल्लवी राऊत व त्यांचे सर्व टीमचे अभिनंदन केले.

प्रशिक्षण ठरले महत्त्वाचे

डॉ. सदानंद राऊत व डॉ. पल्लवी राऊत करत असलेल्या जनजागृती व डॉक्टरांचे प्रशिक्षणामुळे रुग्ण हॉस्पिटलमध्ये वेळेवर पोहचला व त्याचे प्राण वाचण्यासाठी मदत झाली. 'मिशन झिरो स्नेकबाइट डेथ' (शून्य सर्पदंश मृत्युदर प्रकल्प) या उपक्रमांतर्गत खासगी डॉक्टर, शासकीय वैद्यकीय अधिकारी आणि रुग्णवाहिका चालकांना मिळालेले प्रशिक्षण या गंभीर परिस्थितीत अमूल्य ठरले.

# पुण्यामध्ये थर्टी फर्स्टच्या पार्टीसाठी कंडोम वाटपाचा कार्यक्रम पोलिसांनी उधळला

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे येथील नववर्षाच्या स्वागतासाठी विविध हॉटेल रेस्टॉरंट बार यामध्ये वेगवेगळे उपक्रम ग्राहकांना आपल्याकडे खेचण्यासाठी केले जातात.

नववर्षाच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या पार्टीमध्ये येणाऱ्या निमंत्रणासाठी एका पब कंडोम आणि ओवा रेस पाकीट देण्यात आले होते. त्यानंतर मोठा वाद उद्भवला होता. पुणे पोलिसांकडून या पबला काल नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर आता पार्टी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आलाय. पोलिसांनी या प्रकरणी चौकशी सुरू केली होती. तसेच या पार्टीसाठी येणाऱ्या लोकांचे जाब सुद्धा घेतले आहेत.

नऊ वर्षाच्या स्वागतासाठी शहरात अनेक ठिकाणी पार्ट्या आयोजित केल्या जातात. अधिक अधिक ग्राहकांना खेचण्यासाठी काही भन्नाट सकल लढवली जाते. पुण्यातील मुंडवा परिसरात अशाच एक हाय स्पिरीट या पब ने कंडोम आणि ी फुकट वाटप केले होते. याचे काही फोटो सोशल मीडियावर वायरल झाले. होते त्यानंतर मोठा वाद उद्भवला होता. पोलिसांनी या प्रकरणात नोटीस पाठवली अखेर पार्टी रद्द करण्यात आली आहे. कंडोम आणि ी पाकीट वाटल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पण या संदर्भात स्पष्टीकरण दिले आहे. तरुणांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून पाकीट वाटल्याचा दावा पब ने केला आहे. तसेच तरुणांना कंडोम चा वापर करण्यासाठी जनजागृती केली आहे. असा दावा पब मालकाने केला आहे. या प्रकरणाची माहिती पोलिसांनी पार्टीला जाणाऱ्यांचे जाब नोंदण्यास सुरुवात केली आहे. कंडोम वाटणे हा गुन्हा नाही असा दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस सज्ज झाले आहेत नवीन वर्षाचे स्वागत करत असताना कुठल्याही प्रकारचे गैरप्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी चौक पोलीस बंदोबस्त असणार आहे. त्याचबरोबर पब ,हॉटेल पहाटे सुरू राहणार असतील तर त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार होणार नाही .याची काळजी हॉटेल चालकांना घ्यावी लागणार आहे. अन्यथा पोलिसांकडून कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

# वादातून पत्नीचा थेट पतीवर हल्ला; महिलेवर गुन्हा दाखल

**शिरूर । प्रतिनिधी**

येथील माळवस्ती येथे पत्नीने घरगुती कारणाने वाद झाल्याने चिडून पतीच्या डोक्यात पहार मारून जखमी केल्याची घटना घडली.

मलठण (ता.शिरूर) येथील माळवस्ती येथे अभिजित भोसले व तृप्ती भोसले हे दाम्पत्य राहत आहे. या दाम्पत्यामध्ये घरगुती कारणातून वाद झाले. या कारणावरून तृप्ती हिने चिडून पती अभिजित यांना शिवीगाळ, दमदाटी करत हाताने मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली.

तसेच घरातील लोखंडी पहार त्याच्या डोक्यात मारून पतीला जखमी केले. याबाबत अभिजित भिका भोसले (वय २८ वर्षे रा. माळवस्ती मलठण ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरुर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी तृप्ती अभिजित भोसले (वय २४ वर्षे रा.माळवस्ती, मलठण ता. शिरुर जि. पुणे) या महिलेवर गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलिस हवालदार अनिल आगलावे करत आहे.

# ज्येष्ठ नागरिकांनी दिला सरत्या वर्षाला निरोप

**पिंपळे सौदागर । प्रतिनिधी**

भावभक्तीपर गाण्यांचे सादरीकरण, वाढदिवसानिमित्त सत्कार आणि नववर्षातील संकल्पाची आखणी करत पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या सदस्यांनी सरत्या वर्षाला निरोप दिला. कुणाल आयकॉन रोडवरील बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर सोमवार दि. ३० रोजी सायंकाळी असोसिएशनच्या वतीने वर्षाअखेरचा कार्यक्रमाचा आयोजित करण्यात आला होता. गुरुवंदनेने प्रारंभ झालेल्या या कार्यक्रमात माजी पंतप्रधान मनमोहनसिंग आणि वर्षभरात असोसिएशनच्या दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. डॉ. सुभाष पवार यांच्या



अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास सखाराम ढाकणे, सुभाष पाटील, अनिल कुलकर्णी, निर्मला कासार, शोभा राजगुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. वर्षा अखेरचे औचित्य साधून असोसिएशनचे सदस्य अशोक येळंमकर, पद्मजा गवळी, माधुरी मुलमुले, डी. बी. कडते, अरविंद मनवेलीकर, घनश्याम आणि भगवती स्वामी यांनी यावेळी वैविध्यपूर्ण गाणी सादर करत उपस्थितांचे मनोरंजन केले. दोन ते अडीच तास चाललेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचलन शकुंतला शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतिश पिंगळे, विवेकानंद लिगाडे, सुभाष विधाते, रमेश वाणी, विजय रोकडे, अशोक येळंमकर, जयपाल सिदनाळे आदींनी परिश्रम घेतले.

# येळकोट येळकोट जय मल्हार; भंडाऱ्याने न्हाऊन निघाला जेजुरी गड

**जेजुरी । प्रतिनिधी**

अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत आणि बहुजन समाजाचा लोकदेव म्हणून प्रचलित असलेल्या खंडेरायाच्या सोमवती यात्रेनिमित्त देवदर्शन आणि कर्हा स्नान, कुलधर्म-कुलाचारासाठी ऐतिहासिक जेजुरीनगरीत चार लाखांहून अधिक भाविकांची गर्दी झाली होती. या वेळी खंडेरायाच्या पालखी सोहळ्या वेळी मंदिर गडकोटांसह कर्हा नदीतीरी भंडाराची उधळण करीत, 'सदानंदाचा येळकोट...येळकोट', 'जय मल्हार' असा जयघोष भाविकांनी केला.

सोमवारी (दि. ३०) या वर्षातील शेवटच्या सोमवती यात्रेनिमित्ताने राज्यातील विविध ठिकाणावरून आलेल्या भाविकांनी कुलधर्म-कुलाचार व देवदर्शनासाठी गर्दी होती. दुपारी १ वाजता देवाचे मानकरी राजेंद्र पेशवे, सचिन पेशवे इनामदार तसेच खोमणे, माळवदकर पाटील यांनी इशारा करताच पालखी सोहळ्याला प्रारंभ झाला. या वेळी देवसंस्थानच्या वतीने बंदुकीच्या फैरी झाडून सोहळ्याला सलामी देण्यात आली. पालखीसमोर निशाण, छत्रचामरे-



अब्दागिरी तसेच घडशी समाजबांधवांच्या वतीने सनईचे मंगलमय सूर निनादत होते. मंदिर प्रदक्षिणेनंतर भंडारगृहातील श्रीखंडोबा व म्हाळसादेवीची उत्सवमूर्ती पालखीत ठेवण्यात आली व पालखी सोहळा गडावरून निघताच हजारो भाविकांनी 'येळकोट येळकोट जय मल्हारचा' जयघोष करीत खंडोबा देवाचे लेणं असणारा पिवळ्या जर्द भंडार्याची उधळण केली. संपूर्ण गड परिसर भंडाराने न्हाऊन निघाला. देवा तुझी सोन्याची जेजुरीचा प्रत्येय भाविकांनी या वेळी अनुभवला. या वेळी देवसंस्थान विश्वस्तांसह समस्त पुजारी, सेवेकरी, खांदेकरी, मानकरी सहभागी झाले होते. जेजुरी गडावरून मार्गस्थ झालेला पालखी सोहळा पायरी मार्गावरून बानुबाई मंदिर मार्गे, नंदी चौक मार्गाने पुढे जाऊन ऐतिहासिक छत्रीमंदिर (मल्हार-गौतमेश्वर) येथे स्थिरावला. त्यानंतर गावातून सोहळा मिरवत कर्हा नदीकडे मार्गस्थ झाला. वजनाने प्रचंड जड असलेली पालखी खांद्यावर घेऊन सुमारे पाच किलोमीटरचे अंतर पूर्ण केले. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पालखी सोहळा कर्हा नदीवरील रंभाईशिंपीन कट्ट्यावर स्थिरावला. कर्हा नदीवर मानकरी व भाविकांनी उत्सवमूर्तींना विधिवत दही, दूध व कऱ्हा स्नान घातले. या वेळी समस्त पुजारी, सेवेकरी, मानकरी, खांदेकरी यांच्यासह भाविकांनी कऱ्हा स्नानाची पर्वणी लुटली. देव अंघोळीनंतर समाज आरती झाली. पालखी सोहळा परतीच्या मार्गावर धालेवाडी दवणेमळा मार्गे जानाई मंदिरात पोहचला. जेजुरीचे ग्रामदैवत जानाई मंदिराचा विसावा झाल्यानंतर पालखी सोहळा रात्री दिवटी बुधालीच्या मंद प्रकाशात मानवी साखळी करीत गडावर दाखल झाला. रोजमुरावाटप (उत्सवमूर्तीचा स्पर्श करून समृद्धीसाठी वाटप करण्यात आलेला प्रसाद) होऊन सोहळ्याची सांगता झाली. पुढील वर्षी सोमवती यात्रेची पर्वणी नसल्याने रविवार (दि. २९) पासूनच लाखो भाविकांनी जेजुरीच्या खंडोबा देवाच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. जेजुरी गड, पायरी मार्ग व संपूर्ण शहरातील रस्ते भाविकांनी फुलून गेले होते. भोर विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी तानाजी बरडे, सहायक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली जेजुरी पोलिसांनी या यात्रेत चांगले नियोजन केले. श्रीमार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजित देवकाते, अनिल सौंदडे, विश्वस्त अॅड. पांडुरंग थोरवे, पोपट खोमणे, मंगेश घोणे, विश्वास पानसे, डॉ. राजेंद्र खेडेकर, व्यवस्थापक व अधिकारी कर्मचारीवर्ग, खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, सुधीर गोडसे, कृष्णा कुदळे, छबन कुदळे, खोमणे, माळवदकर पाटील, पुजारी, सेवकवर्ग, देवाचे मानकरी, पालखी सोहळ्याचे खांदेकरी आदींनी या सोहळ्याचे नियोजन केले.

# सतीश वाघ खून प्रकरण: मोहिनी वाघ, अतिश जाधवची येरवडा कारागृहात रवानगी

**पुणे । प्रतिनिधी**

हडपसरमधील शेतकरी तसेच हॉटेल व्यावसायिक सतीश वाघ यांच्या खून प्रकरणात त्यांची पत्नी मोहिनी वाघ हिच्यासह सहा आरोपींची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. मोहिनी वाघ व अतिश जाधव यांच्या पोलीस कोठडीचे हक्क



अबाधित ठेवून त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. वानवडी येथील न्यायालयातील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी प्रचेता राठोड यांनी हा आदेश दिला.

पवन शर्मा, नवनाथ गुरसाळे, विक्की शिंदे, अक्षय जावळक, मोहिन वाघ व अतिश जाधव अशी न्यायालयीन कोठडी झालेल्यांची नावे आहे. त्यांच्या पोलीस कोठडीची मुदत संपत आल्याने त्यांना सोमवारी (दि. ३०) न्यायालयात हजर करण्यात आले. या वेळी सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ज्योती वाघमारे यांनी युक्तिवाद केला.

युक्तिवादादरम्यान अॅड. वाघमारे म्हणाल्या, जाधव व गुरसाळे यांनी गुन्ह्यात वापरलेले हत्यार पेरणे फाटा येथील भीमा नदीपात्रात टाकले असल्याचे सांगितले आहे. त्यासमक्ष गोताखोर टीमच्या साहाय्याने नदीपात्रामध्ये शोध घेण्यात आला. मात्र, हत्यार अद्याप सापडले नाही. तपास करायचा असल्याचा युक्तिवाद अॅड. वाघमारे यांनी केला. न्यायालयाने सरकार पक्षासह बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकून घेत सर्व आरोपींची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली